म. ग्रं. [illegible] ठाणें

विषय
नाटक

संग्रहालय क्रमांक
203

लेखक गो. ब. देवळ

सन

पुस्तकाचें नांव दुर्गा नाटक
एक दिवसाची कुंडी

58

नाटक

# एकच दिवसाची चुकामूक

अथवा

# दुर्गानाटक.

( एका इंग्रजी नाटकाच्या आधारानें रचिलेलें. )

---

गोविंद बल्लाळ देवल,

यांनीं

तयार करून

पुणें येथें

"पुणेंवैभव" छापखान्यांत छापविलें.

---

फेब्रुवारी सन १८८६ इ०.

---

**किंमत ६ आणे.**

---

हें नाटक राजाराम कॉलेजचे प्रिन्सिपाल मे० क्यान्डी साहेब यांनीं पसंत करून याजबद्दल कर्त्यास ७५ रुपयांचें बक्षीस दिलें आहे.

नाटकाचे खरे मर्मज्ञ व सहृदय अशा लोकांस

हें लहानसें नाटक आंतील गुणाव-

गुणांसह कर्त्यानें अत्यादर-

पूर्वक समर्पण केलें

असे.

नाटकाचे खरे मर्मज्ञ व सहृदय अशा लोकांस

हें लहानसें नाटक आंतील गुणाव-

गुणांसह कर्त्यानें अत्यादर-

पूर्वक समर्पण केलें

असे.

## या नाटकावर दिलेले कांहीं परीक्षकांचे अभिप्राय.

" This is a very creditable performance. It is a horrible tragedy of the type of some of the tragedies of Shakespeare .. .....The story appears to be original. If it can be called an adaptation, it must be admitted to be a very successful adaptation.........In this novel attempt the author has attained considerable success. His language is chaste, natural, and occasionally humorous. The incidents are striking without being unnatural or absurd, and they keep up the interest of the reader till he goes to the end of the story......... The play would perhaps present may difficulties in acting, and possibly it may not be duly apprecia-ted by an audience of ordinary tastes. But it is nevertheless an excellent reading."

Kolhapur,
12 th September 1885.

B. B. Wakharkar B. A.
Vice Principal, Rajaram College, Kolhapur.

---

" This is a good tragedy and I approve it. The dramatic effect is well sustained through-out the play, and the development of the plot and charac-ters is effected with considerable skill...........The piece is rather difficult for acting. It will require actors of considerable skill to represent Durga and Tuláji. "

10 th September 1885.

N. G. Phatak B. A. L. L. B.,
District Magistrate Kolhapur.

---

"Very effective and attractive; keeps one's mind always in excitement and curiosity.... ........It deserves a high place among the manuscripts that are sent for competition ."

V. G. Apte, L. M. & S.

---

" नाटकाचें संविधानक बरेंच चांगलें आहे. शोकपर्यवसाय फारच मनाला लागणारा आहे. भाषा चांगली जशी असावी तशी आहे........आनंदराव हें पात्र जसें असावें तसें आहे. काळ्याचें पात्र फारच चांगलें आहे. त्यानें ह्यातान्या धन्याचें वर्णन दिलेलें फारच खुबीदार आहे. या पात्राची मदत नाटकाचें संविधानक स्पष्ट करण्यामध्यें होतें. हें पात्र त्याच्या भाषेच्या योगानें पहिल्या नंबरचें शोभतें. कोंडाऊ हेंही पात्र उत्तमापैकींच आहे. चंद्ररावाचें पात्र चांगलें आहे व त्यास शोभा त्याच्या पत्नीच्या एकनिष्ठेमुळें होते. आतां मुख्य पात्र दुर्गा. हें तर सर्वोत्कृष्ट साधलें आहे. यांत कांहीं कमी दिसतच नाहीं ह्मटलें असतां चालेल, व ह्याविषयीं पाल्हाळ लावणें ह्मणजे उगीच चांगल्या गोष्टी सांगणें होईल........"

G. P. Gadre.

*Tutor to the Chief of Ichalkaranji.*

---

# दुर्गानाटकांतील पात्रें.

जिवाजीराव कुंभे............एक सधन वृद्ध गृहस्थ.
चंद्रराव....................जिवाजीरावाचा वडील मुलगा.
तुळाजीराव.................. ,, धाकटा ,,
आनंदराव....................एक श्रीमान तरुण गृहस्थ.
सोमाजीराव..................चंद्ररावाचा स्नेही.
काळ्या......................गडी.
सटव्या......................एक मारेकरी.
दुर्गा........................चंद्ररावाची बायको.
बाळ्या......................तिचा मुलगा.
कोंडाऊ......................दुर्गाची दासी.

सरकारी शिपाई, मारेकरी वगैरे.

# एकच दिवसाची चुकामूक !

अथवा

# दुर्गानाटक

## अंक १.

---

### प्रवेश पहिला.

### मुरलीधराच्या मंदिरासमोरील बाग.

---

तुळाजीराव—( हातांत पत्र घेऊन येतो )-कोणी कांहीं ह्मणोत; परंतु मला या जगांत पैशासारखें सुखाला दुसरें साधनच दिसत नाहीं. द्रव्याची आशा मोठी वाईट. तिच्यामुळें मनुष्याच्या हातून प्रसंगीं मोठमोठीं पापें होतात असें कोणी ह्मणतात, परंतु माझ्या मतानें तर या ह्मणण्यांत कांहीं अर्थ नाहीं. कारण, मनुष्याजवळ पैशाची ऊब आहे तोंपर्यंतच तो शहाणा, तोंपर्यंतच त्याला चार चौघांत मान, तोंपर्यंतच त्याला सौख्य, नाहीं तर त्याला विचारतो कोण ? त्यांतून स्वतःच्या अनुभवावरून मी तर सध्यां पैसा ह्मणजे परमेश्वर मानतों. कारण, आमचें घराणें पडलें लेंकवळ्याचें, द्रव्य आहे ह्मणून लोक विचारतात तरी ! इतकें असून हे आमचे खुळे दादासाहेब आह्मांला पत्रें लिहितात कीं, " बाबासाहेबांचा आतां मजविषयीं ग्रह काय आहे ? त्यांचा राग कमी झाला कीं नाहीं ? मी बंदीखान्यांतून सुटून तिकडे आलों तर कसें होईल ? कुटुंबाकडील कांहींच हकीकत आपण लिहिली नाहीं ह्मणून फार काळजी लागली आहे, ती पत्रोत्तरीं दूर करावी. " ( पत्र फाडीत फाडीत ) करतों

# दुर्गानाटकांतील पात्रें.

जिवाजीराव कुंभे............एक सधन वृद्ध गृहस्थ.
चंद्रराव.....................जिवाजीरावाचा वडील मुलगा.
तुळाजीराव.................. ,, धाकटा ,,
आनंदराव...................एक श्रीमान तरुण गृहस्थ.
सोमाजीराव.................चंद्ररावाचा स्नेही.
काळ्या.......................गडी.
सटव्या.......................एक मारेकरी.
दुर्गा..........................चंद्ररावाची बायको.
बाळ्या........................तिचा मुलगा.
कोंडाऊ.......................दुर्गाची दासी.
सरकारी शिपाई, मारेकरी वगैरे.

# एकच दिवसाची चुकामूक !

## अथवा

## दुर्गानाटक

# अंक १.

---

## प्रवेश पहिला.

### मुरलीधराच्या मंदिरासमोरील बाग.

---

तुळाजीराव—( हातांत पत्र घेऊन येतो )–कोणी कांहीं ह्मणोत; परंतु मला या जगांत पैशासारखें सुखाला दुसरें साधनच दिसत नाहीं. द्रव्याची आशा मोठी वाईट. तिच्यामुळें मनुष्याच्या हातून प्रसंगीं मोठमोठीं पापें होतात असें कोणी ह्मणतात, परंतु माझ्या मतानें तर या ह्मणण्यांत कांहीं अर्थ नाहीं. कारण, मनुष्याजवळ पैशाची ऊब आहे तोंपर्यंतच तो शहाणा, तोंपर्यंतच त्याला चार चौघांत मान, तोंपर्यंतच त्याला सौख्य, नाहीं तर त्याला विचारतो कोण ? त्यांतून स्वतःच्या अनुभवावरून मी तर सध्यां पैसा ह्मणजे परमेश्वर मानतों. कारण, आमचें घराणें पडलें लेंकवळ्याचें, द्रव्य आहे ह्मणून लोक विचारतात तरी ! इतकें असून हे आमचे खुळे दादासाहेब आह्मांला पत्रें लिहितात कीं, " बाबासाहेबांचा आतां मजविषयीं ग्रह काय आहे ? त्यांचा राग कमी झाला कीं नाहीं ? मी बंदीखान्यांतून सुटून तिकडे आलों तर कसें होईल ? कुटुंबाकडील कांहींच हकीकत आपण लिहिली नाहीं ह्मणून फार काळजी लागली आहे, ती पत्रोत्तरीं दूर करावी. " ( पत्र फाडीत फाडीत ) करतों

बरें ! सर्व काळजी एकदम दूर करतों. आतांशी तोच विचार रात्रंदिवस माझ्या डोक्यांत घोळत असतो. ( पत्राचा चुरा दूर फेंकून देऊन )--ह्मणे मी तिकडे आलों तर कसें होईल ? फार खासें होईल ! आमच्या छातीवर सध्यां कोणी नाहीं, ते तुह्मीं येऊन बसाल. अरे शहाण्या ! पूर्वीं तूं इथें असतांना माझी स्थिति काय होती ती अजून मी विसरलों नाहीं. मेलेल्या भावाला जिवंत करून आपला हिस्सेदार करीन इतका मी दुधखुळा नव्हे बरें ! बाबांच्या समजुतीनें मेला आहेस तो तिकडेच मर. पैशापेक्षां मला कांहीं तूं जास्त नाहींस. यदा कदाचित् तिथून सुटून आलास तर तुझ्या दुधाच्या पेल्यांत विष कालवून ठेवावयाच्याच मसलतींत मी आहें. आनंदरावाच्या साहाय्यानें ती मी कशी तरी पार पाडणारच--अरे हा आनंदरावच आला वाटतें. स्वारी तिकडूनच आलीसें दिसतें. ( आनंदराव येतो. )

**तुळाजी०**—एकून तुह्मीं खरे एकनिष्ठ भक्त यांत शंका नाहीं !

**आनंद०**—पण त्या निष्ठेची फलप्राप्ति इष्ट देवता प्रसन्न होईल तेव्हां !

**तुळाजी०**—अहो प्रसन्नही झालीच पाहिजे. तिची पिच्छा मात्र सोडूं नका ह्मणजे झालें. तुह्मांला ठाऊक आहेच कीं, शिवाजीच्या हातीं सिंहगड कांहीं एका दिवसांत नाहीं आला.

**आनंद०**—तें खरें. पण आज सतत सात वर्षें मी तिच्या आराधनेंत हा देह झिजवीत आहें, तरी आशेवांचून मनाला दुसरा कांहीं आधार नाहीं !

**तुळाजी०**—मी ह्मणतों आशा तरी आहे ना ! मग आणखी काय पाहिजे ? आशा ह्मणजे कामी पुरुषांचें जीवन ! तेव्हां ती जर आहे तुम्हांला, तर ती मिळायचें कांहीं कठीण नाहीं.

आनंद०—परंतु ती तरी माझी मींच लावून घेतलेली ! मीं आतांच सांगितलें ना कीं, माझ्या मनाला धीर येईल असें तिचें अद्यापि बिलकुल चिन्ह दिसत नाहीं. यावरून काय तें आणा ध्यानांत.

तुळाजी०—नाहीं दिसलें त्याचें कारण मी सांगतों. अहो, ब्रह्मदेवानें स्त्री ही एक या जगांत अजब चीज पैदा केली आहे. क्षणांत हंसेल, क्षणांत रुसेल. क्षणांत मुरकेल, क्षणांत गुरकावील. एकदां हं, एकदां अंहं. असे हां हां म्हणतां हजारों रंग दाखवील. मोठी मानी, मोठी संशयी, मोठी भित्री, मोठ्या कोवळ्या मनाची, अशी ही स्त्री जात ! तेव्हां अमुकच एका मार्गानें वागलें ह्मणजे तिचें मन आपल्या स्वाधीन होईल असें कांहीं कुणाला सांगतां यायचें नाहीं. माझ्या मतानें तर त्याला एकच उपाय आहे. तो कोणता म्हणाल तर वर्म गाठून घाव घालावा कीं, आलीच हातांत !

आनंद०—म्हणजे ?

तुळाजी०—म्हणजे एखाद्या अडचणीच्या प्रसंगांत गांठून लगट करावी कीं झालीच स्वाधीन म्हणून समजा. असें केल्यानें आपला कार्यभाग सहज साधून जातो. त्रास नको, आर्जव नको, कांहीं नको !

आनंद०—ही तुमची युक्ति खरी आहे. पण यांत आपल्याकडे थोडा नामर्दपणा येतो. कारण, प्रसंगांत सांपडल्यावर पुरुषासारखा पुरुषसुद्धां पाहिजे त्याला हूं ह्मणेल. मग ही तर बायको ! ही कबूल होईल यांत विशेष काय ? मला खुषीचा सौदा करायचा. बरें आतां गप्पांत अर्थ नाहीं. तिची जाऊन गांठ घेतों.

तुळाजी०—हं चला. पण माझी युक्ति तुम्हांला पसंत पडली नाहींसें दिसतें ? असो, तुमच्या म्हणण्याप्रमाणें कां

होईना. कुणीकडून कार्यभाग झाल्याशीं कारण. इकडे पडलों तुमचा स्नेही, तिकडे पडलों तिचा दीर. दोघांकरितांही मला झटलेंच पाहिजे. ( इतक्यांत दुर्गा आपल्या वाड्याच्या खिडकींतून दिवस किती आला हें पहाण्याकरितां बाहेर पहाते. )

तुळाजी०—अहो ती पहा वयनी खिडकींत उभी आहे. आमचे बंधु वारून आज सात वर्षे झालीं, पण बिचारीची ती दुःखित मुद्रा पाहून नुक्के काल वारले कीं काय असें वाटतें !

आनंद०—प्रीति म्हणजे अशीच असली पाहिजे. बरें जातों तर. ( असें म्हणून दुर्गाच्या वाड्याकडे निघून जातो. )

तुळाजी०–( आपल्याशीं ) बाबा झणतात त्या प्रमाणें ही माझी पांढऱ्या पायांची भावजय खरोखरीच मूर्तिमंत साडेसाती आहे ! कांहीं तरी कुभांड रचून मीं हिला आमचा वाडा तर बंद केलाच. आतां माझें पुढचें काम झणजे इतकें-च कीं, ही घोरपड आनंदरावाच्या गळ्यांत बालावयाची ! म्हणजे थोडक्याच दिवसांत स्वारीचें वाटोळें झालें झणून समजावें, आणखी त्याच्याच गळ्यांत घातली पाहिजे. कारण, त्याच्या सर्व घरच्या माणसांना श्रीमंतीची मोठी घमेंडी चढली आहे. वास्तविक पहातां काल भीक मागत फिरत होते; पण कुठें रेषा उमटली झणून या भाग्याला चढले. तेव्हां थोरपणाचा इतका गर्व येणें, व आह्मी झणजे अगदीं यःकश्चित् नादान मनुष्य आहोंत असें त्यांनीं मानणें हें कांहीं आपल्याला पसंत नाहीं. आतां आनंदरावाशीं जरी मी वरबर स्नेहभावानें वागतों, तरी त्याच्या घरच्या माणसांची रिकामी ऐट मला सहन होत नाहीं. या आनंदरावाच्या बहिणीनें आपल्या स्वरूपाच्या व थोरपणाच्या तोऱ्यांत माझा अव्हेर केला हीही गोष्ट माझ्या मनांत जळत आहे. त्या अपमानाचें स्मरण झालें म्हणजे सर्वां-

गाचा भडका होऊन जातो. माझ्यांत तिनें असें कोणतें व्यंग पाहिलें होतें? माझें घराणें अगदीं हलकट असें तिला वाटलें काय! आणि त्या पोरीच्या बोलण्याला या आनंदरावाच्या थेरड्यानें आणि थेरडीनें रुकार दिला काय? बरें आहे ह्मणावें! याचा वचपा काढीन तेव्हां सोडीन! वयनीच्या पायगुणानेंच कां होईना, पण त्याच्या घरादाराची धूळधाण करवीन तरच नांवाचा तुळाजीराव! आणखी मी ह्मणतों त्याप्रमाणें होणार, कारण वयनीविषयीं आनंदरावाच्या मनांत आज सात वर्षें खिळून राहिलेली आशा त्याच्या देवाच्यानें सोडववत नाहीं. तो तिच्या पायां पडेल, तिचीं आर्जवें करील, काय पाहिजे तें करील, पण तिच्याशीं पाट लावील. तिला ही सध्यां कोणाचा आधार नाहीं तेव्हां अन्नान्न दशा झाली म्हणजे तीसुद्धां नाहीं ह्मणायची नाहीं. ( किंचित् विचार करून व इकडे तिकडे फिरून ) तें एक तिचें कारटें! सापाच्या पोराप्रमाणें माझ्या मार्गांत विघ्न करणारें आहे! तिला बाहेर घालविल्यामुळें त्याची कांहीं फारशी भीति नाहीं म्हणा. परंतु न जाणो. बाबांची लहर आहे ती! त्या कारट्याची मला लवकरच कांहीं तरी व्यवस्था लावली पाहिजे. चला आतां. कुठें तरी फिरकी मारून परत जातांना वयनीच्या बिऱ्हाडावरूनच घरीं जाऊं म्हणजे झालें. ( असें म्हणून निघून जातो. )

---

## प्रवेश २.

### दुर्गाचें घर.

[ मुलगा मांडीवर घेतलेली दुर्गा व आनंदराव बोलत असतांना पडदा उघडतो. ]

**दुर्गा**—आनंदराव, तुह्मी कां बरें उगीच माझी पाठ

पुरवितां? मी कीं नाहीं चहूंकडून अगदीं नाडून गेलें आहें. माझ्या जिवाची खरोखरच ओढाताण झाली आहे. तेव्हां तुह्माला मी आतां काय देऊं? काय उरलें आहे माझ्यापाशीं? तुमचे माझ्यावर खंडोगणती उपकार झाले आहेत. एखादा भाऊ देखील आपल्या बहिणीचा अशा विपत्तींत इतका समाचार घ्यायचा नाहीं! मित्रांनीं सोडलें, मैत्रिणींनीं टाकलें, नातेवाइकांनीं दूर केली! अशा प्रसंगीं तुह्मीं या अनाथ लेकराच्या आईचा इतका समाचार घेतां हें कां थोडें झालें? ( डोळ्यांतून पाणी काढते. )

**मुलगा**—आई, ललतीस ग कां?

**दुर्गा**—माझें नशीब खोटें ह्मणून रडतें बाळा!

**आनंद०**—पण यांत मी विशेष तें काय करतों? कोणालाही स्नेहधर्म पाळलाच पाहिजे.

**दुर्गाः**—होय. ह्मणूनच मेलें मला वाटतें कीं स्नेहभर्वानेंच स्नेहभावाची फेड करावी. पण काय करूं? भिकारीण पडलें ना? यासाठीं सांगतें माझा लोभ सोडून देऊन सुखांत नांदा.

**आनंद०**—सुख! तुमच्यावांचून मला सुख कसें होणार, बरें? मी जो द्रव्यसंचयाचा एवढा खटाटोप चालविला आहे, तो तरी या आशेवर कीं तुह्मीं आह्मीं मिळून कधीं तरी त्याचा उपभोग घेऊं.

**दुर्गा**—तुमचें बोलणेंच आतां मला ऐकून उपयोग नाहीं. ( तोंड फिरविते. )

**आनंद०**—अस्सा अस्सा आज सात वर्षें अस्सा मी तुमच्या नादांत गुंतलों आहें, व माझ्या कमनशीबानें माझी इच्छा जरी पूर्ण झाली नाहीं, तरी तुमच्या नादांतच मरेपर्यंत दिवस काढीन. असेंच समजा कीं माझा तुह्मी अंगिकार करीपर्यंत मी जीवंत काय आणि मेलों काय एकच.

**दुर्गा**—हीं भाषणें मला आतां अगदीं विषासारखीं कडू

लागतात. नको नको ! बाळाच्या तोंडाकडे पाहिलें ह्मणजे पूर्वीचें सगळें डोळ्यापुढें उभें रहातें ; आणि 'माझ्या मागें तू या जगांत इतके दिवस राहिलीस कशी ?' असें ह्मणून मला ते रागेंच भरतात कीं काय असें वाटतें. ( मुलाचें चुंबन घेते. ) बाळ्या ! मी तरी काय करूं बरें ! मला सुख कां वाटतें यांत ?

**आनंद**०—झालें ! इथें बोलणेंच खुंटलें ! असें कांहीं तरी तुमचें दुःखाचें बोलणें ऐकलें ह्मणजे आशेची चटकन् निराशा होते ; पण चमत्कार हा कीं, माझें मन अधिकाधिक वेधून जातें. तुमच्या लग्नापूर्वीं मी तुह्माला नुसत्या या दृष्टीनें पहात होतों, व तेवढ्यावरूनच त्या वेळीं माझ्या मनांत तुमच्याविषयीं लोभ उत्पन्न झाला होता. पण तेव्हांपासून तुमच्याच चिंतनामुळें, व नित्य सहवासाच्या योगानें तुमच्या सद्गुणांचा अनुभव येत गेल्यामुळें, मला आतां असें वाटूं लागलें आहे कीं, त्या वेळची ती केवळ कामवासनाच होती. परंतु आतां तिला प्रेमाची व विचाराची भर पडली आहे. सध्यां तुमच्यावर आकाशच कोसळल्यासारखें झालें आहे. तथापि माझें तुमच्यावरचें प्रेम चंद्रकलेप्रमाणें नेहमीं वाढतेंच आहे.

**दुर्गा**—तुह्मी नाहींना ऐकत ? हें पहा माझ्यासाठीं जर तुमच्या मनांत कांहीं थोडी कळकळ असेल, तर कृपा करून हें असलें भाषण एकदम बंद करा कसें ! माझ्या मनांतून सासऱ्याला भेटायला जायचें आहे, पहातें एकदां नशीबाची परीक्षा करून. ह्मणून ह्मणतें तुह्मी चला आतां.

**आनंद**०—मी कांहीं नको ह्मणून आग्रह करीत नाहीं. पण सासऱ्याला भेटून कांहीं फायदा होईल असें मला तर दिसत नाहीं. खर्चाला पाहिजे असेल तर माझ्यापाशीं कां नाहीं मागत बरें ? खरेंच ह्मणतों, अडचण आहे कीं काय ?

दुर्गा—मी सांगितलें ना एकदां कीं मनाचा संशय एकदां मी फेडून घेणार. होय नाहीं तर नाहीं. पण मेली रुखरुख नको मागून.

आनंद०—बरें तर, येतों मी. (असें ह्मणून निघून जातो.)

## प्रवेश ३.

(दुर्गा सासऱ्याच्या वाड्याकडे चालली असतां मागून तुळाजी येतो.)

तुळाजी—अरे ही आमची भावजय! पोराला कडेवर घेऊन कुणीकडे निघाली बरें? (जरासा पुढें जाऊन.) अरे ही आमच्याच वाड्याकडे वळली. हं! समजलों. ही बाबासाहेबांकडे तोंड पसरायला जात असेल. ठीकच आहे! पोटांत आग पेटली ह्मणजे कुर्रा कसा राहणार! बरें आहे. जा ह्मणावें! तोही ह्मातारा पक्का खप्पी आहे! तो हिला आणि हिच्या कारट्याला एक क्षणभर देखील दारापाशीं उभें राहूं द्यायचा नाहीं. मीही पण मागच्या दरवाज्यानें आंत जाऊन बसतों. ह्मणजे काय काय मजा उडेल ती ऐकायला सांपडेल. (असें ह्मणून झटकर जातो. दुर्गा पुढल्या दरवाज्यापाशीं जाऊन पोंचते)

दुर्गा—अग बाई! हा तर बंद केला आहे! देवा! आमच्या आजापणजांच्या वेळीं श्रीमंतांच्या वरीं अंधळ्या पांगळ्यांना, दीन अनाथ माणसांना सदां मुक्तद्वार असे ह्मणून सांगतात तें काय तर मग? ती धर्मबुद्धि आतां कुणीकडे गेली? धर्मात्मा कुणी राहिलाच नाहीं का? नाहीं तर मला माझ्याच फुटक्या नशीबाचा हा खेळ ह्मणावा झालें! (दारावर हळून धक्का मारते.) कुणी आहे का? दार उघडा.

मुलगा--( कडेवरूनच दरवाज्यावर भराभर हात आपटीत ) अले दाल उघल किले.

( काळ्या गडी दिंडी उघडून बाहेर येतो. )

**काळ्या**---काय कार है इचिमन ! उगिच का लावलि-या पिरपिर आं ? जनुका कुनी अवतनुच धाडल व्हत ! आमच धनी कस हैती तुला दकल न्हे व्हय ? हत कोन तुला येची म्हन्नार न्है न् काइबी न्है. का आल का ध्यनांत ?

**दुर्गा**---कां बाबा ! पण तुझे धनी घरांत आहेत का ?

**काळ्या**---माज धनी घरांत हैति का !

**दुर्गा**---जिवाजीराव कुंभे इथेंच रहातातना ?

**काळ्या**---व्हय व्हय. इथच न्हाल्यात. त्ये माज धनी न् मी त्येंचा चाकर पन् बाई त्येची चवकशी तुला कशापायी ?

**दुर्गा**---कशापायीं ह्मणजे ? तुला नाहीं का ठाऊक मी कोण तीं ?

**काळ्या**---मला न्है बा ठाव. तुला कंदीं बगितल्यावानी वाटतया. पन आमी पडलो चाकरमानस. तवा अमास्नी कुनाची वळक असली तरी बी न्है ह्मन्न भाग पडतया. का म्हुन् न्है इचारलस ?

**दुर्गा**---कां बरें ?

**काळ्या**---का बर हांजी ? आमास्नी धन्याची खेटर बसत्यात म्हुन. ( असें ह्मणून दिंडी झांकूं लागतो, इतक्यांत बाहेरून कोंडाऊ या नांवाची दुर्गेची कुळंबीण येते. )

**कोंडाऊ**---हं दिंडी लावूं नकोसरे, मेल्या देवानें तुला सोन्यासारखें तोंड दिलें आहे, नि असें घाणेरडें काय बोलतोस तें? मी आपली इथें बाजूला उभी राहून ऐकत होतें. ह्मटलें काय काय बोलतो तें तरी पाहूं. चांगलें मुखें बोललास तर नांवाला डाग लागेल वाटतें ? ही बाई कोण ह्मणून समजलास तूं ? ( काळ्या तिच्याकडे रागानें बघतो. )

**दुर्गा**—तूं आलीस म्हणून बरें झालें. नाहीं तर यानें कांहीं माझी दाद लागूं दिली नसती. दिवस फिरले म्हणजे चाकरमाणसें सुद्धां फिरतात बरें !

**कोंडाऊ**—या माझ्या सोन्याच्या तुकड्याला आंत जायला अटकाव म्हणजे काय ! ( मुलाचा मुका घेते. ) बाईसाहेब, तुम्ही चला आंत ( दुर्गा आंत जाते. ) काळ्या, तुला किनई अगदीं कळत नाहीं. अडदांड कुठला ! कुणाला काय बोलावें न् कुणाशीं कसें वागावें हें आतां तरी नीट ध्यानांत ठेव.

**काळ्या**—अग उग बम ! तुला मी मागपुन् वळकुन् है. तुला अङुगर कोनीं हटिकल ठ्वत ? गुमान आल्या वाटन् जाव, त्य दुसऱ्याच कोरड्यास दवळायची तुला का जरूर ! तूं म्हन आंत जा ! बाबा साहबाची खेटर बसत्याल मर्ग. तिला भाइर काडतीस कां मी धरूं रत्याला ?

**कोंडाऊ**—असें बोलूं नये काळ्या. प्रत्यक्ष बाबा साहेबांच्या वडील सुनेला, नि तिच्या मुलाला आंत जाऊं दिलें नाहींस, तर लोक शेण घालतील कीं तुझ्या तोंडांत ! घरच्या माणसांना कारे कोण आडवितें ?

**काळ्या**—मग कस कर म्हनतीस ? आमी पडलो हुकुमाची मानूस. तवा हुकुमापरमान् वागाय व्होव. बर पन् ही बाई कशापायीं आलिया हत ? कंच काम है ? माज्या अङुगर तूं या वाड्यांत ऱ्हाइली व्हतीस म्हुन् इचारतो. ही बाई चांगली, असं सार जन म्हनत्यात इकुन अमुनशेनी हिच्या सासऱ्यान—मंजी आमच्या बाबासाहबांनीं हिच असं का हाल मांडल्याती ?

**कोंडाऊ**—हं तें मी सांगतें. तुला ठाउकच आहे कीं मी कांहीं तिखट मीठ लावून सांगणारी बायको नव्हे. जें आहे तें थोडक्यांत, पण खरें खरें तेवढें सांगतें.

काळ्या—हुं सांग तर. तूबी लइ गमती म्हतारी हैस!

कोंडाऊ—मेल्या अजुन चाळिसी सुद्धां उलटली नाहीं, नि इतक्यांत मी म्हातारी झालें कारे? —

काळ्याः—बर न्हायल! तरबी जान् फटाकडीवानी हैस झाल? पन म्होर सांग.

कोंडाऊ—बरें तर ऐक. तुझ्या बाबासाहेबांचा थोरला मुलगा चंद्राजीराव ह्मणून होता. त्याच्यावर बाबासाहेब अगदीं जीव कीं प्राण करीत असत. तोही पण रूपानें काय, गुणांनीं काय, खरोखर वाखाणणी करण्यासारखा होता. एखाद्या राजाच्याच पोटीं यायचा पण नशीब खोटें ह्मणून यांच्या पोटीं आला होता इतकेंच. तेव्हां काय झालें—हो—किती झालें तरी मेली पोरबुद्धि कीं नाहीं! त्या चंद्ररावानें आपल्या इष्ट मित्रांना न विचारतां, बाबासाहेबाचेंही कांहीं भय न बाळगतां, या दुर्गाबरोबर आपल्याच हट्टानें एका खेड्यांत जाऊन लगीन केलें.

काळ्या—कस म्हंतुस, हट्टान? छे! ह्ये तर त्येनी लइ वंगाळ काम क्येल. मी ह्मन्तो तिची तरी कबुली घ्येवी की न्हैं?

कोंडाऊ—असें नव्हेरे. तिची कबुली होती. पण तिला आई नाहीं, बाप नाहीं. तेव्हां तिच्या कडून हुंडा. पांडा काय मिळणार? ह्मणून बाबासाहेबांच्या मनांतून तिला आपली सून करून घ्यायचें नव्हतें. समजलास?

काळ्या—हां! आल ध्येनांत. इचिभन समदीं भाण्डण पैशापायीं! ह्योच हंडाभर हुंडा घावला असतां, मंजी बाबासाब खुस झाल असत. कैकाइनीवानी असती तरी बी तिला त्यानी आपली सून करूनशेनी घेतली असती! बर ह्मोर?

कोंडाऊ—ह्मोर काय कपाळ! आपल्या मुलानें आ-

पल्यास विचारलें देखील नाहीं ह्मणून बाबासाहेबांची त्याच्या-वर खप्पा मर्जी झाली. पुनः तोंड दिखील पाहायचा नाहीं म्हणून त्यांनीं खंडोबापुढें शपथ वाहिली. जिनगीदौल-तींचा मालक तुळाजीरावाला करून त्याला मर्जींत घेतला. पूर्वीं नाहीं तर त्याच तुळाजीरावाला पाहून बाबासाहेबांच्या तळपायाची तिडीक मस्तकाला जात असे बरें! पण मेलें कायसें म्हणतात कि नई त्यांतली गत.मी ह्मणतें इतकें करून तरी त्यांचा राग जावा कीं नाहीं पण ह्मातारपणचा राग तो! सरकारचे कान फुंकून शेवटीं चंद्रावाला जबरदस्तीनें लढाईवर धाडला, तो बिचारा तिथेंच आटपला! झालें आटपलें रामायण न् काय?

**काळ्या**—अरेरे! गरीब परानी! बर ह्मोर?

**कोंडाऊ**—पुढें इच्याच पायगुणानें तो मेला असें ह्म-णून तिला वाडा बंद केला.

**काळ्या**—बग इचिभन कसा वाकडा इनसाव ह्यो? नवऱ्यापायीं त्येच्या बायकुच हाल. लई दिस मी हिला अशीच बगतुया.

**कोंडाऊ**—त्यांतून तरण्या ताठ्या बायकांनीं नवऱ्या-शिवाय दिवस काढायचे ह्मणंज फार कठीण आहे बाबा. कुणावर असा प्रसंग येऊं नये एवढेंच खरें.

**काळ्या**—अग त्ये बग, बाबासाब आन् ती तुझी बाई बोलत्याती. जा वाइस बाजुला उबी र्‍हा जा. मी ह्मी सद्रवर बसतों. (असें ह्मणून दोघेंही जातात.)

---

## प्रवेश ४.

(जिवाजीराव व मुलगा घेतलेली दुर्गा.)

**जिवाजी०**—ज्यांनीं तुला माझ्याकडे यायची मसलत

सांगितली त्यांनीं तुला खरोखर फसविलें. हा नव्हे तुझा रस्ता; जा, निघ. आलीस तशी चालती हो. डोळ्यापुढें उभी राहूं नकोस माझ्या. माझ्यापासून तुला कांहीं मिळायचें नाहीं. चल, निघ !

दुर्गा—मला देखील तुमच्यापासून कांहीं नको. पण मेलें मनुष्य विपत्तींत पडलें ह्मणजे त्याला दुसऱ्यापाशीं तोंड वेंगाडणें भाग पडतें. तुह्मीं माझें बोलणें शांतपणानें ऐकून घ्याल असें मला वाटलें होतें, पण—

जिवाजी०—पण काय ? काय बोलशील तूं ? किती बोलशील ? तुझ्या—अवदसेच्या—पायगुणानें माझ्यावर अनर्थ कोसळला, माझ्या वृद्धापकाळचा सर्व आधार तुटला; माझ्या सुखाचें तूं मूळच खणून काढलेंस; या गोष्टी तूं कितीही बड-बडलीस, आणि कितीही रडलीस तरी भरून येतील का ?

दुर्गा—तुमची एकट्याचीच का अशी अवस्था झाली ? माझ्या नाहीं का जन्माचें मातेरें झालें ? ( दुःख दाबून डोळे पुसते )

जिवाजी०—हां, ह्मण असें. असें बोललीस तर मो-ठ्या आनंदानें मी तुझें रडगाणें ऐकून घेईन.

दुर्गा—एकूण माझी हालअपेष्टा झाली ह्मणजे त्यांत तुम्हांला आनंद आहे ह्मणायचा ?

जिवाजी०—आहे ह्मणजे ? दुसरी या जगांत मला आ-नंदाची गोष्टच उरली नाहीं.

दुर्गा—तर मग घ्या आनंद करून ! माझा सर्वस्वी नाश झाला आहे खरा.

जिवाजी०—बस्स, बस्स ! तुझी दुर्दशा व्हावी हेंच माझें देवापाशीं गाऱ्हाणें होतें. तें त्यानें ऐकलें. आतां माझा आत्मा थंड झाला; नाहीं तर मेल्यावर समंध होऊन तुला छळलें असतें. समजलीस ?

**दुर्गा**—देवा ! हाच कारे वडिलांचा आशिर्वाद ! जन्माचें सुख तर त्यांच्याबरोबर नाहींसें झालें होतें, पण तसाच कांहीं दिवस जीव वांचविला. आतां मेली तीही आशा उरली नाहीं. कांहीं जवळ होतें नव्हतें तें सगळें या पोटाच्या भरीला घातलें. शेवटीं अगदीं निरुपाय होऊन तुह्मीं सख्खे सासरे म्हणून तुमच्या दाराशीं आलें. तुम्हांला जर कांहीं या अनाथ लेंकराची दया आली तर पहा, नाहीं तर—( रडूं लागते ). बाळ्या, पड बाबा, आजोबांच्या पायां पड. तुझ्याकडे बघून तरी त्यांना आपल्या मुलाचें स्मरण होऊंदे. ( मुलगा पायां पडावयास जातो. जिवाजीराव रागावून मागें सरतो. मुलगा भिऊन रडूं लागतो. ) मामंजी, मी तुमच्यापुढें पदर पसरतें, या लेंकराकडे पहा. मी नाहीं इतकी माझ्या जिवाची पर्वा करीत, पण हा पोटचा गोळा म्हणून जीव तडफडतो हो, काय करूं !

**जिवाजी०**—या मुलाबद्दल मलासुद्धां वाईट वाटतें, पण तुझ्या पोटचाना तो ?

**दुर्गा**—अरे कपाळा ! असा दावा उगाविणें आपल्यासारख्यांना शोभत नाहीं बरें. आपलें नातवंड ह्मणून तरी त्याचा सांभाळ करा.

**जिवाजी०**—करीन पण तूं आहेस साडेसाती. तुझें मग त्याला वारेंसुद्धां लागून उपयोगाचें नाहीं. कबूल आहे तुला हें ?

**दुर्गा**—काय कबूल आहे का म्हणतां ? त्याचें मला तोंड दिसावयाचें नाहीं हें ? नकोग बाई तें ! माझ्या सोन्याकडे पाहून मी इतके दिवस जिवंत राहिलें, आणि आतां जर तुह्मीं त्याला दूर केलात तर माझी काय वाट ? मामंजी ! इतके कसे हो तुह्मीं निष्ठुर झालां ? असें असेल तर मी आपली त्याला घेऊन जातें कशी. कुठेही चार घरें मागून

त्याच्या पोटाला घालीन. माझा जीव मला जड झाला आहे, पण माझें लेंकरूं नाहीं मला जड झालें, समजलांत ? ( मुलास पोटाशीं धरते )

जिवाजी०—तर हो चालती आपल्या कारट्याला घेऊन; भीक मागून पोटाला घाल कीं कसेंही घाल. चल निघ.

दुर्गा—जातें बरें! चल बाबा (मुलग्यास घेऊन ). कांहीं केलें म्हणून दगडाला का पाझर फुटेल !

मुलगा—आई, मला भूक लागली, जेवायला केव्हां घालनालग.

दुर्गा—चल घरीं घालतें हं. ( असें ह्मणून डोळे पुशीत मुलाला घेऊन निघून जाते. )

जिवाजी०—काळ्या ! ए काळ्या ! ( काळ्या येतो ) कायरे ए गध्या, तुला इथें गाढवें राखायला ठेवला होता कारे ?

काळ्या—गाडव कशापायी बाबासाब ! दरवाजा राकीत बसलुया नव्ह का ?

जिवाजी०—मग ही तुझी काकी कशी आली होती तर आंत ?

काळ्या०—माजी काकी कशाला येतिया हत. त्याच बाईन बरडुन् वरडुन् डोस्कं उटिवल म्हुन् दिंडि उगडुन्शेनी भाइर ग्येलो. आन् मी नग नग ह्मनतोया तरीबी बेगुमान आत घुसली. धादा सांगितल बगा बाबासाब ! तवा ह्यांत माजा कंचा अन्याव व्हर ?

जिवाजी—तिला आंत येऊं नकोस ह्मणून तूं दहादां सांगितलेंसना ? ठीक केलेंस! असा असावा हुषार चाकर! बरें आतां तिच्या घराकडे जा, आणि सांग कीं मी त्यांच्याकडून आलों आहें. चार घरें जास्त मागून माझ्याही पोटाची तजवीज कर ह्मणावें. ०जा, मला तुझ्यासारख्या मगरूर चाकराची

जरूर नाहीं. पुनः हा उंबरा चढलास तर पाय मोडीन. सांगून ठेवतों. ( काळ्या ' कां बाबासाब ' करीत असतां जिवाजीराव त्याचें बोचकें व कांबळें त्याच्या अंगावर फेंकून देतो, व आपोआप जात नाहीं, असें पाहून त्याच्या रव्याला धरून त्यास बाहेर घालवितो. तो गेल्यावर पुटपुटत दरवाजा लावून घेतो .)

( अंक पहिला समाप्त. )

# अंक २.

## रस्ता.

( आनंदराव व तुळाजीराव येतात. )

आनंद०—दुर्गाचें व तुमच्या वडलांचें बोलणें झालें तें तुह्मीं सर्व ऐकलें ह्मटलेंत, ह्मणून विचारतों. त्या बिचारीची दुर्दशा पाहून, किंवा त्या पोरक्या लेंकराकडे पाहून तुमच्या बाबासाहेबांच्या मनाला कांहीं द्रव आला का ? ( तुळाजीराव वाईट तोंड करून नकार दर्शवितो. ) नाहीं ! तुमच्या मुद्रेवरून कांहीं सुचिन्ह दिसत नाहीं. तुह्मांला तर त्या दोघांबद्दल वाईट वाटतच असेल ह्मणा, परंतु तुमचे वडील—जाऊंद्या तुमच्याकडे बघुन मी गप्प बसतों. खरोखर तुह्मीं कांहीं त्यांचे चिरंजीव शोभत नाहीं! तोंडावर तारीफ करावी असें नाहीं, पण तुमच्यासारखा जिवास जीव देणारा मित्र दुसरा मिळणें कठीण.

तुळाजी—हें काय परस्पर आहे. मला तरी तुमच्या सारखा मिळेल का ? नाहीं ! आतां आमच्या बाबांच्या संबंधानें गोष्ट काढलीत ह्मणून सांगतों. आमच्या वाड्यांत पोरकें पोर अथवा अनाथ बायको या शब्दांचा अर्थच दाऊक

नाहीं ! मग तसें जर कुणी आलें तर द्रव कुणाला येणार ? पण त्याबद्दल तुह्मीं बाबांना दोष लावूं नका. कारण, त्यांचा असा ग्रह झाला आहे कीं, त्या साडेसाती बरोबर लग्न केलें ह्मणून चंद्रराव लढाईंत पडले. पण जाऊंद्या ही वाटाघाट मला कशाला पाहिजे ? उगीच स्नेहांत मात्र व्यत्यय यायचा. तुह्मी माझे जिव्हाळ्याचे मित्र, आणि ती माझी सख्खी भावजय ! तेव्हां उभयतांचेंही हित व्हावें म्हणून मी या कृत्यांत इतकें मन घातलें आहे. दुसरें कांहीं कारण नाहीं.

आनंद०—हित व्हावें ! आणि तें उभयतांचेंही ! छे छे छे छे ! ! तिला तुह्मीं म्हणतां त्याप्रमाणें बिकट प्रसंगांत गांठून आपलें हित साधून घ्यावें असा माझा बिलकुल उद्देश नाहीं बरें ! तिची दुर्दशा करण्यांत तुमच्या बाबांचा कांहीं तरी मतलब असेल. पण माझें तर उलटें असें आहे कीं, तिचें सुख तें माझें सुख. ह्मणून ज्या योगानें तिला सुख होईल तें मला कर्तव्य. समजलांत ?

तुळाजी०—मग मी तरी तेंच ह्मणतों. बाबांनीं तिचे हाल चालविले आहेत हें पाहून देवाशपथ मला फार वाईट वाटतें. पण करूं काय ? माझा कांहीं इलाज चालत नाहीं. त्यांना तर मी अक्कल शिकवायला जायचें नाहीं ! तरी सहज बोलतां बोलतां दोन तीनदां निरनिराळ्या तऱ्हेनें गोष्ट काढली होती कीं, हें करणें लौकिकांत बरें दिसत नाहीं, नांवाला बट्टा, शिवाय अमक्या अमक्याच्या सुनेची अशी स्थिति झाली, अशी चोहोंकडे कुजबुज होऊं लागलेली माझ्या कानावर आली. असें, आनंदराव, पुष्कळ सांगून पाहिलें. पण आमचे बाबा काय विचारतां ! जें एकदां डोक्यांत शिरलें तें शिरलें. तें मग ब्रह्मदेवाच्या बापालासुद्धां निघायचें नाहीं ! तरी मी म्हणतों कीं, जें

झालें तें एका अर्थानें बरेंच झालें. कसें ? तर या स्थितींत ती आहे तोंपर्यंतच तुमचें काम साधायचें असलें तर साधेल.

आनंद०—पुनः आपलें तेंच ! मी तुम्हाला सांगितलेंना कीं, मी असा नामर्दपणा पत्करायचा नाहीं. त्यांतून ती आहे खंबीर मनाची बायको ! ती या हालाला मुळींच जुमानीत नाहीं !

तुळाजी०—हेंच तें ! आनंदराव ! अशा नाजूक कामाला इतका धार्मिकपणा काय उपयोग बरें ! अहो 'येन केन प्रकारेण' आपलें काम साधून घ्यावें, आणि मग पाहिजे तितका धार्मिकपणा दाखवीत बसावें. हें पहा, असा एक साधारण नियम आहे कीं, भिडस्त, अब्रूला भिणाऱ्या अशा बायका, प्रसंगांत सांपडल्या असल्या म्हणजे बहुतक-रून तेव्हांच वश होतात.

आनंद०—( आवेशानें ) होत असतील. पण त्या-चें मला काय ? अशा रीतीनें तिला वश करून घ्यायचें हें काम माझ्या हातून प्राण गेला तरी व्हायचें नाहीं. माझी इच्छा पूर्ण झाली नाहीं तरी बेहत्तर आहे. मरे-पर्यंत नुसत्या आशेवरच दिवस काढीन. स्वसंतापानें तिनें आपला देह मला अर्पण केला तरच मी त्याचा स्वीकार करीन, व त्यांतच मला भूषण आहे. नाहीं तर प्रसंगांत गांठून, फसवून —नको नको नको ! मला तें कर्तव्यच नाहीं.

तुळाजी०—द्या सोडून ! तुह्मांला बरें वाटेल तसें तुह्मीं करा. पण मीं जें सुचविलें तें केवळ स्नेहभावानें सुचविलें एवढें ध्यानांत ठेवा ह्मणजे झालें.

आनंद०— तें झालें. त्याविषयीं मला शंकाच नाहीं. बरें, जातों आतां उशीर झाला.

तुळाजी०— पुढें भेट ?

**आनंद०**—अहो, भेट नेहेमीचीच आहे. ( जातो. )

**तुळाजी०**—( तो गेला असें पाहून आपल्याशीं ) शेंपूट आणि शिंगें नाहींत ! बाकी खरा बैलोबा ! आह्मांला झालें तरी असलींच देवमाणसें उपयोगीं पडतात ! तूं पाहिजे त्या मार्गानें तिला वश करून घे, माझा कार्यभाग साधला ह्मणजे झालें. तुझा स्वभाव मी पक्का ओळखून आहें. तूं जसजसा आपल्या मनाचा थोरपणा दाखवीत जाशील तसतसा माझ्या मसलतीला जोरच येणार ! बरें, आतां अगोदर आमच्या भावजयीकडे जाऊं; कारण, पदरांत माप पडेपर्यंत तिच्याही तोंडावर मला वरचेवर साखर पेरली पाहिजे ! करता काय ? ( जातो. )

---

# प्रवेश २.

## दुर्गाबाईचा वाडा.

( दुर्गा व कोंडाऊ. मुलगा खेळांत गुंतला आहे. )

**दुर्गा**—कधीं नाहीं कधीं सर्वांचा शेवट हा व्हायचाच. आतां दिसतें तें ह्मणजे घटकेनें दिसल असा कांहीं नेम नाहीं. जें एकदां गेलें तें गेलें. म्हणून ह्मणतें, कीं, राजा काय नि रंक काय ? सर्वांची एकच वाट शेवटीं. यमाच्या दरबारांत लहान, थोर, सगळे सारखेच. सगळ्यांना एकाच तराजूनें जोखायचें. श्रीमंती न् गरीबी या जगापुरतीच मेली. देवा ! या पापिणीचे डोळे कधीं रे मिटतील ? या जाचांतून मी एकदां कधीं रे सुटेन ? तुला कां या हतभागिणीची कींव येत नाहीं ? एकदां आपल्याजवळ घेऊन जा ह्मणजे सुटलें बाबा ! ( रडू लागते. ) पण तिथें जर का माझ्या सासऱ्यासारखाच कुणी निर्दय 'कारभारी अस-

ला तर मग आटपलेंच ! पण देवाच्या घरीं तसें नाहीं व्हायचें. त्याला मी न् माझा सासरा दोघेंही सारखींच.

कोंडाऊ—बाईसाहेब, असें काय बरें ? मन अम्मळ घट्ट केलें पाहिजे.

दुर्गा—दगडापेक्षां दिखील घट्ट केलें आहेग. पण सगळ्यांनींच मला झिडकारून टाकावें असें मी मेलें पातक तरी कोणतें केलें आहे; तूंच सांग बरें? देवाच्याच मनांत माझे विनाकारण हाल करावयाचे एवढेंच; पण त्याला तरी मी काय म्हणून बोल लावतें ? पूर्वजन्मींचें माझेंच कांहीं पातक उभें राहिलें असेल तर तें भोगलें पाहिजे. अगदीं निमूट-पणें भोगलें पाहिजे. असो, देवा ! तूं दिनांचा दयाळू आ-हेस म्हणून तुझ्यापाशीं पदर पसरून मागतें कीं, माझे तं पाहिजे तितके हाल कर, पण माझ्या अनाथ लेकरावर तु-झ्या कृपेची सांवली असूंदे. माझें म्हणून त्याच्या आजासार-खी तूंही त्याची छळणूक करूं नकोस. एवढी भिक्षा मला घातलीस ह्मणजे माझें कांहीं अधिक मागणें नाहीं. ( सुस-कारा टाकून. ) मी मेली म्हणतें, पण तसें कुठलें व्हायला ! ( रडूं लागते. ) पायगुणाची पडलें ना मी ! ज्याच्यावर ह्म-णून माझें वारें पडेल त्याचें कधीं चांगलें व्हायचें नाहीं. कोंडाऊ, तुझीच पाहिनास गोष्ट. तूं माझ्याजवळ राहिलीस म्हणुन माझ्यासारखेच तुझेही हाल चालले आहेत कीं नाहीं-त. हीच जर दुसरी कुठे असतीस तर सुखांत असतीस.

कोंडाऊ—भलतेंच कांहीं तरी. माझे मुळींच हाल होत नाहीत. यापेक्षां जरी आपल्यावर वाईट प्रसंग आला तरी मी आपल्यास सोडायची नाहीं. मरेपर्यंत तुमचीच चा-करी करीन.

दुर्गा—बरें बाई. तुझ्याही नशिबीं कष्टच सोसायचे आहेत म्हणून तुला अशी बुद्धि होते. कोंडाऊ, तुला खरेंच

सांगतें कीं, आजपर्यंत मीं जीं दुःखें भोगलीं त्यांचा जर मला विसर पडेल तर पुढच्याबद्दल मी कांही इतकी दिखील काळजी करायची नाहीं. पण काय करूं ग ! माझ्या मनांत नाहीं नाहीं त्या भलत्या विचारांनीं एकच गोंधळ करून टाकला आहे . बघावें तिकडे मेला अंधार दिसतो ! आशा धरायला मेली जागाच उरली नाहीं. ( इतक्यांत काळ्या येतो. त्याच्याकडे पाहून ) काय बाबा ! तुला पाठविलें होतें त्याचें काय करून आलास !

काळ्या—त्ये काय इचारू मगा बाइसाब ! काम फिसाकल्यावानी झालं. त्यो मेजी आदुगर मारवाड्याचा बाप ! नराम बोलून कस त्ये त्याला ठाव बी न्हई इचिभन. मला बगन्या वरूवर वागावानी गुरकाऊनच आला बगा अंगावर ! तवा मी बी वाइसा न्येट केला. म्होर हकडल तकडल जरा रडगान लावूनशेनी मला म्हनूला—जा तुझ्या बाइला जाऊन सांग मागल्या डागिन्यावर आतां एक कवडी बी गावायची न्हई. व्हावा असल पैसा तर दुसरा आनुग्र्र ठ्येव तवा मिळल म्हनाव ! इचिभन! सावकार ह्मनत्याती पन मांग है बगा बाईसाब. चोरावानी डोळा लावतुया मानूसावर !

दुर्गा—समजलें, त्याच्याकडे काय आहे दोष ? माझेंच फुटकें नशीब माझ्या हात धुवून पाठीशीं लागलें आहे ! घरांत अठरा विसवे दरिद्र, बाहेर देणदारांचें देणें, नशीबाचे हे असे दिवे लागले आहेत, नी मेली आशा तर कसलीच उरली नाहीं ! आतां माझी दशा तरी काय होणार देवा ! ( डोळ्यांतून पाणी काढते. ) नाहीं म्हणायला ही एक आंगठी उरली आहे. इतके दिवस त्यांची आठवण म्हणून प्राणापलीकडे जतन करून ठेवली होती. पण जळली या पोटाची आग विझवायला ती दिखील विकण्याची

पाळी येऊन ठेपली! जा बाबा काळ्या. ही आंगठी घेऊन जा नी त्या सावकारापाशीं ठेव. सगळ्यांनींच सोडलें, मग ही तरी कशी राहील ! ( काळ्या जातो. ) ( दुर्गा मुलास ह्मणते ) बाळ्या ! कां आलास बाबा माझ्या पोटीं ? तूं जन्माला आलास, तेव्हां मुद्दां मला इतके कष्ट झाले नाहींत, पण आतां तुझ्या मायेमुळें मला फार कष्ट होतात. माझ्या मरणाच्या भीतीपेक्षां तुझें पुढें कसें होईल ही मला मोठी भीति पडली आहे. ( कोंडाऊस ) पण तो कुठे माझ्याकडे पहातो आहे ? खेळाच्याच नादांत दंग होऊन गेला आहे. माझ्या पोटांत काय वणवा पेटला आहे तें त्याच्या गांवीं देखील नाहीं ! आणि नाहीं तेंच बरें आहे बाबा ! ( क्षणभर त्याच्याकडे सचिंतपणें पाहून ) खरोखर अशा विचारांनीं मला खूळ लागेल. बरें विचार करून तरी काय उपयोग ? सुख नाहीं तें नाहीं, नी जिवाला उलटा त्रास मात्र अधिक होतो. ( इतक्यांत काळ्या धांवत धांवत येतो. )

**काळ्या**—लई यंगाळ येळ येऊन शेनी ठ्येपली बाइसाब!

**दुर्गा**—अरे असें झालें तरी काय ?

**काळ्या**—आंगठी घेऊनशेनी मी त्या सावकाराच्या घराकड निगालों इकत्यांत वाटमंदीच त्यो मला भ्येटला. त्येच्या बरुबर दुसरबी लोग तीग हैती. आपून घरी हैसा का म्हुन् मला इचारलं. मी बी हैती म्हंतूलं. तवा मला म्होर घालून त्ये माज्या मागून येऊन खालीं आंगनांत उबं ऱ्हायल्याती. कोतवालूच शिपाईबी हैती बरुबर. म्होर कंचा इचार?

**दुर्गा**—विचार कसलान् काय कसलें घेऊन बसलास? मेलें व्हायचें असेल तें होईल. कपाळीं लिहिलें असेल तितकें भोगलें पाहिजे ना ? ( इतक्यांत तुळाजीराव येतो. ).

**तुळाजी०**—वयनी ! ज्यानें तुझ्या जन्माची माती माती करून टाकली त्या निर्दय बापाच्या पोटीं मी उत्पन्न झालों

म्हणून तुला वयनी या नांवानें हांक मारायची सुद्धां मला लाज वाटते ! मी कसा आहें व बाबांचें हें निंद्य आचरण मला कितपत आवडतें याची तुला खात्री असेलच. मीं होऊन तें सांगितलें पाहिजे असें नाहीं. बरें या अडचणीच्या वेळीं माझा कांहीं तुला उपयोग होण्यासारखा आहे का? असला तर सांग. (ती बोलत नाहीं असें पाहून) बाबांचा मला विशेष संताप यायला आणखी एक कारण झालें आहे. तें कोणतें म्हणशील, तर आजचा हा वाईट प्रसंग तुझ्यावर येणार हें त्यांना पूर्वींपासून ठाऊक असून, त्यांनीं मला तुझ्याबद्दल जामीन होऊं नकोस म्हणून अगदीं निक्षून सांगितलें आहे. काय करूं ! मी मोठ्या पेंचांत सांपडलों आहें. तुला प्रसंगीं उपयोगीं पडूं कीं, बाबांची मर्जी संभाळूं? हें तुला विचारतों. बाकी मला तर असें वाटतें कीं, या कामीं बाबांची सल्ला अगदीं कुचकामाची आहे.

दुर्गा—भाउजी, माझ्यावर तुमचें इतकें लक्ष्य आहे हेंच मी फार समजतें. आतां माझें तुम्हांला सांगणें इतकेंच कीं, त्यांनीं मामंजींचें मन दुखविलें तर केवढा अनर्थ झाला हें लक्ष्यांत आणा, नी तुम्हीं तरी तसें करूं नका. नाहीं तर माझ्यासाठीं तुमचें मात्र नुकसान होईल.

तुळाजी०—तें खरें. बाबा एवढ्यावरून माझें नुकसान करायला मार्गें पुढें पहायचे नाहींत ही मला खात्री आहे. पण अशा वेळीं जर मी तुझ्या उपयोगीं पडलों नाहीं तर तूं मला काय म्हणशील, चार लोक काय म्हणतील, व माझें मन तरी मला काय म्हणेल? (इतक्यांत खालीं गलबला होतो).

दुर्गा—भाउजी, कुणी कांहीं म्हणत नाहीं. तुम्हीं उगीच माझ्याकरतां संकटांत पडूं नका.

तुळाजी०—बरें, अगोदर ते खालीं ओरडत आहेत त्यांना दोन शब्द सांगून बघतों. तोंपर्यंत तूं कांहीं तोड काढून ठेव ( असें म्हणून जातो ).

दुर्गा—आतां कसली कपाळाची तोड काढूं ? दैवच काय करील तें करील. मरणाला सुद्धां मी भीत नाहीं. होय तर काय मेलें ! अगबाई ! ते आले वाटतें काळ ! ( कोंडाऊ, दुर्गा, मुलगा. सर्व आंतल्या खोलींत जातात ).

# प्रवेश ३.

( तुळाजीराव, आनंदराव, व शिपाईलोक येतात. )

आनंदराव—हां ! अशी बडाई करूं नका. कर्ज कर्ज काय तें हजार रुपयेच ना ? दहा हजार रुपये जरी असते तरी ते फेडून टाकण्याची माझ्या आंगांत ताकत आहे हें तुम्हाला ठाऊक असून असा दंगा कां करता ? तुमचा पैसा मी देईन. आहे काय त्यांत !

शि० लोक—आह्मांला तरी रावसाहेब आणखी काय पाहिजे ! त्यांनीं उलगडा केला काय, आणि आपण केला काय एकच.

आनंद०—उद्यां या तर मग.

शि० लो०—(मुजरा करून निघून जातांना विचारतात.) उद्यां खास ना ?

आनंद०—हो, अगदीं खास.

दु०—( बाहेर येऊन ) उद्यां काय ? नी खास काय ? आज तेंच उद्यां ! कांहीं दुसऱ्याच संकटांत मला लोटणार वाटतें ?

आनंद०—छे छे ! संकटांत नाहीं, आनंदांत लोटणार !

दु०—आतां मला या जगांत आनंदाची आशाच नाहीं

उरली. रिकामी मेली जिवाला हुरहुर कशाला लावता ? काय आहे तें सांगानात ?

तुळाजी०—चायका मिथ्या ह्मणतात तें कांहीं खोटें नाहीं. वयनी कर्ज कर्ज तें काय ; आणि त्यासाठीं इतका धीर सोडतेस ? त्या म्हाताऱ्याच्या तापट स्वभावामुळें मला कांहीं इकडे तिकडे करतां येत नाहीं, पण तुला दुसरा आधार देणारा कुणी नाहीं असें समजूं नकोस.

दु०—माझ्यासारख्या भिकारणीला कोण आधार देणारा मिळणार भाऊजी ?

तुळाजी०—असें कां म्हणतेस ? असे तसे नव्हेत, अगदीं जिवाचे आहेत समजलीस ? हे पहा आनंदराव ऐन प्रसंगीं तुला संकटांतून पार पाडायला तयार झाले आहेत.

दु०—( किंचित् विचारांत पडल्यासारखें करून ) ते कसे मला पार पाडणार ? यांत त्यांचा मतलब काय तें तरी कळलें पाहिजे.

आनंद०—मतलब दुसरा कांहीं नाहीं. फक्त स्नेहासाठीं मी पुढें झालों. तुमच्यावर असा प्रसंग गुजरावा व मी तुह्मांला मदत करावी अशी माझी बिलकूल इच्छा नव्हती; व हें कधीं माझ्या मनांत सुद्धां आलें नाहीं. कारण, दुसऱ्याच्या ऋणांत रहाणें तुम्हांला आवडत नाहीं हें मला पक्कें माहीत आहे. त्यांतून माझ्या ऋणांत तर मुळींच नको.

दु०—( मनाशीं ) खरेंच नको.

आनंद०—माझ्याविषयीं तुमच्या मनांत शंका आली याबद्दल मला दिलगिरी वाटते. पण तुमच्याच गळ्याची शपथ घेऊन सांगतों कीं, तुमच्या वरचा प्रसंग टाळावा यावांचून माझा दुसरा कांहीं मतलब नव्हता. प्रसंगीं उपयोगीं पडेल तो स्नेही, हें मनांत वागवून मी तुह्मांला आज आमीन

झालों. तात्पर्य काय कीं मला एकदां स्नेही असें माना; आणि मग तुम्ही सांगाल तर माझ्या मनांतील पुष्कळ दिवसांची आशा आंतल्याआंत दडपून टाकून वैरागी होऊन कुठें तरी निघून जातों.

दु०—( आपल्याशीं ) हा यांचा उदारपणाच मला जाचणार बरें ! कांहीं मतलबाशिवाय हजार रुपयांवर पाणी सोडायला कोण तयार होणार !

आनंद०—( तिनें एकदम तोंड फिरविलेलें पाहून ) असें कशाला ? मी तुमच्याकडे पहातों म्हणून जर तुम्हांला त्रास होत असला तर मीच जातों निघून ! पुनः तुमच्या दृष्टीस ह्मणून पडायचा नाहीं. ( उठून जाऊं लागतो. )

तुळाजी०—( त्यास थांबवून ) पण हें असलें दूर दूरचें बोलणें उपयोगीं नाहीं. वयनी, मी तुला असें विचारतों कीं, आनंदरावांच्या बोलण्याचा खरा भावार्थ तुला कळला आहे का ?

दु०—तो कळून पुष्कळ दिवस झाले. पण त्याचें काय ?

तुळाजी०—नाहीं, मी म्हणतों कीं, मी समजतों तोच जर त्यांचा हेतु असेल, आणखी तोच जर तूं बरोबर ताडला असशील, तर त्यांच्या मनोदयाप्रमाणें जुळून यावें हें मलाही बरें दिसतें.

दु०—म्हणजे भाऊजी ! म्हणतां काय तुम्ही ?

तुळाजी०—माझें म्हणणें कांहीं वावगें नाहीं. हें पहा, तुझ्यावर हा असा प्रसंग आलेला ! तुझ्या खऱ्या आधाराचा खांब ईश्वरानेंच उपटून टाकला. माहेरचें कुणी उरलेंच नाहीं. इकडे सासरा हा अशा प्रकारचा ! मी आहें; पण माझेही हात मावांनीं जखडून टाकले आहेत. मुलगा तर अजून पांच सहा वर्षांचा बच्चा ! प्राप्ति मुळींच

नसून आंगावर कर्जाची रक्कम वाढत चाललेली! बरें, कुठ तरी एखाद्या गरीबाच्या बायकोप्रमाणें दळण कांडण करून पोट भरावें तर लौकिक संभाळला पाहिजे! तेव्हां या सर्व गोष्टींचा जर पोक्तपणानें विचार केला, तर आनंदरावांचा व तुझा विवाह व्हावा हें मला इष्ट दिसतें.

दु०—काय! विवाह!

तुळाजी०—हो. कारण असा योग पुनः जुळून यायचा नाहीं. या उपर जर तूं आपलाच हट्ट घेऊन बसलीस तर तुझेंही नुकसान, तुझ्या मुलग्याचेंही नुकसान. तेव्हां नीट विचार कर. (कांहीं वेळ तिच्याकडे पाहून) आतां कदाचित् तुझ्या मनांत ज्ञातींतील लोकांची भीति आली असेल तर तीही काढून टाक. कारण, शिंद्यांच्या घराण्यांत पोट लावायची चाल कांहीं नवी नाहीं. इतकें कशाला? वयनी, तुला खात्रीनें सांगतों कीं, असें कांहीं झाल्यावांचून आनंदरावांच्या उपकारांचें ओझें हलकें व्हायचें नाहीं.

दुर्गा—(तुळाजीस) त्यांचे माझ्यावर किती उपकार आहेत हें माझें मला नाहीं का कळत भाऊजी? (आनंदरावाकडे पाहून) तुमच्या उपकाराची फेड कशी करावी याच विचारात आहे मी.

आनंद०—याला इतका विचार कशाला पाहिजे? फक्त दोन शब्दांचें काम!

दुर्गा०—पण तुह्मी मानतां तसें मात्र नाहींहो! कारण, माझ्या मनांतील सुखाची हौस, ते गेले, त्या दिवशींच करपून गेली. इतकेंही असून जर तुम्हीं माझ्याशीं—(एकीकडे) अगबाई! मी कुणीकडे वहावलें ही! नको रे देवा! (उघड) तुह्मीं जा आतां. (असें म्हणून एकदम निघून जाते.)

आनंद०—(निराश होऊन) तुळाजीराव! बोलतां बोलतां हें काय लचांड झालें?

**तुळाजी**०—समजलों मी काय झालें तें. अहो, या बायका आहेत बरें ! मी पूर्वीं तुम्हांला सांगितलें होतें. त्यांतलाच हा एक बहाना आहे. आधींच ओढून ताणून चंद्रबळ आणण्याचें यांना वाळकडूं असतें, त्यांतून दीर जवळ, म्हणून अधिक लाजली.

**आनंद**०—मग याला पुढें तोड ?

**तुळाजी**०—तोड कसली ! मी जातों घराकडे निघून. तुम्हीही आणखी अर्ध्या घटकेनें तिची गांठ घ्या म्हणजे झालें. तिच्या मनांत आहे यांत कांहीं शंका नाहीं.

**आनंद**०—बरें तर, तोंपर्यंत मुरलीधराचें दर्शन घेऊन येतों. काय होईल तें तुम्हांला कळवीनच. ( दोघेही निघून जातात. पडदा पडतो. )

**( अंक दुसरा समाप्त. )**

---

# अंक ३.

## प्रवेश पहिला.

**स्थळ—दुर्गाचा वाडा.**

**पात्रें—काळ्या व कोंडाऊ.**

**काळ्या**—आमासारक्या गरिबाच लगिन घाटायच झाल, तरी बी कमित कमी पंदरा रोज लागत्यात्, आन् ह्ये कस झाल ? काल सकाळच्या पारी मी वाइसा भाइर ग्येलो, आन् परत येतुया त्यो सगळाच रंग न्यारा दिसाय लागला. तुला दोन चार हाका मारल्या, पन् तू बी आपल्याच कामांत गरक्. आनंदराव आल, त्यंच्या बरोबर गडीमानूस आली, आन् सगळीच घाई. मांडव घाला, उपाद्व्याला हटका, अमक्यासनी बलावून करा, तमक्याला घ्येउनशानी या,

अशी येकुच धांदल उडाली बग. साच्यापारी ह्मोतुर लागुन पार. पन् ह्ये सम्द जुळल कस ? इक्ती घाई कशापायीं ? आन् बाइसाबची घाट लावाय कशा राजी झाल्या ?

कोंडाऊ—सगळें सांगतें. पण लग्नाच्या घाईसारखीच विचारायची घाई करूं नकोस. एकेक विचार म्हणजे सांगतें.

काळ्या—इळ म्हाइ म्हुन मी हाका मारतुया आन् ही म्हन येकेक इचार. बर सांग बया. ह्ये म्होतुराच जुळल कवा ? येकुच सांग अदुगर.

कोंडाऊ—काल सकाळीं तू बाहेर गेलास तेव्हां आनंदराव इथें बसले होते ना ?

काळ्या—व्हय. अजारी मानसावानी वाइट तोंड करून बसल व्हत.

कोंडाऊ—मेल्या ! नुसते बसले होते असें म्हटलें असतेस तर ? पण कुत्र्याचें शेंपूट, सरळ कसें होणार ?

काळ्या—तसं नव्ह. मी हत म्हाइल्यापुन् बगतुया, कवाबी आनंदराव आल तरी गुमान बसत्याती. अस कशापायीं ?

कोंडाऊ—तुला आनंदरावाची पूर्वीची हकीगत थोडीशी सांगितली पाहिजे. आमच्या बाईसाहेबांचे वडील भवानराव. त्यांच्या मनांतून बाईसाहेबांना आनंदरावाला द्यायचें होतें. व आनंदरावाच्या मनांतही बाईसाहेब फार भरल्या होत्या. पण नवज्वराची भावना होऊन भवानराव एकाएकीं वारले, म्हणून तो बेत राहित झाला. ब्रह्मदेवाची योजना दुसरे ठिकाणीं होती, तिथें कोण काय करणार ? पुढें आनंदरावही कांहीं दिवस आजारी पडले होते; त्या संधींत चंद्ररावांनीं बाईसाहेबांच्या मावशीकडून खटपट करवून घाईघाईनें लग्न उरकून घेतलें. आनंदराव बरे झाल्यावर हें वर्तमान कळून त्यांना फार वाईट वाटलें, आणि

त्याच तिडकेसरशीं त्यांनीं शपथ घेतली कीं मरेपर्यंत दुसरीशीं लग्न करणार नाहीं.

**काळ्या**—आं ! एकाद्या रडव्या पोरावानी शपत घेयाचं कच कारन? तिच्याच नशिबी न्है म्हंतल दिल सोडून्. दुसरी नरनी गोरीपान् बायकु का गावली नसती व्हय? इत्तिभन पैसा असल्यावर बायकासनी काय दुकाळ? रोज घा मिळन्याल व्होत्या तर.

**कोंडाऊ**—तें खरें, पण हें बघ काळ्या, त्यांचें काय नी कुणाचें काय ? एखाद्या ठिकाणीं एकदां मन जडलें म्हणजे तिथून निघून दुसरीकडे लागायचें मोठें कठीण. त्यांतून आनंदराव पडले सरळ स्वभावाचे, खऱ्या अंतःकरणाचे. तूं म्हणतोस तसें दुसऱ्या एखाद्यानें केलें असतें. तें कांहीं असो; त्यांनीं त्या वेळीं शपथ घेतली खरी, पुढें वर्षा सव्वा वर्षानें चंद्रराव लढाईवर कसे गेले, कसे वारले, हें मी तुला सांगितलेंच आहे. ती खबर तुळाजीरावानें आनंदरावाला कळविनांच त्यांच्या मनांत बाईसाहेबांबरोबर पाट लावायची इच्छा पुनः उत्पन्न झाली.

**काळ्या**—पन ह्ये अदुगर सांग मला—आनंदराव मंजी एकाद्या मानकऱ्यावानी थाटांत ऱ्हात्याती, घरान्दार दिसत्याती, आन् त्येंच्यांत पाटाची बायकु करत्यात का ? थोर थोर मराठ्यांत चाल न्है.

**कोंडाऊ**—अरे पैशानें थोर, एरवीं कुळी हलकीच. लेकवळ्यांचीं घराणीं हीं. तुला नाहीं का माहित?

**काळ्या**—कुनी सांगितल्याबिगार कस ठाइत असतया ? आतां झाल म्हइत. पन् चंदरराव मरून आज सात वरस झालीं, आन् इक्ता रोज आनंदराव का झोप घेत ऱ्हते व्हय ? तवाच पाट लावला असता तर आजपातुर दोन पोरग झाल असत.

कोंडाऊ—मेल्याची कल्पना विलक्षणच कांहीं तरी. सांगतें तें ऐकून घे, नी मग कल्पना करीत बैस हवा तर.

काळ्या—बेर आतां तोंडाला मुस्क घालतों. सांग झोर.

कोंडाऊ—चंद्रराव मेल्यावर चार पांच महिन्यांनीं, आनंदराव बाईसाहेबांकडे समाचाराला ह्मणून वरचेवर यायला लागले.

काळ्या—पन् मनांतला कावा मनांत अन् समाचार.—

कोंडाऊ—ऐकरे अगोदर, पूर्वीपासूनचं घरोबा होता, कांहीं नवीनत्र नाहीं जायला लागले. पुढें वर्ष दोन वर्षं दुःखांतच गेलीं; पण मग मुलाचे बाळखेळ पाहून बाईसाहेबांचें दुःख कमी व्हायला लागलें. नंतर आनंदराव मधून मधून पर्यायानें गोष्ट काढीत होते. पण बाईसाहेब घट्ट मनाच्या, त्यांनीं ह्मणून कांहीं आनंदरावाची गोष्ट मनांत घेतलीच नाहीं. खर्चावेंचाच्या संबंधानें अडचण पडूं लागली, तरी त्या डगल्या नाहींत; तुळाजीरावानें पुष्कळ रदबदल्या केल्या, तरी मन वळलें नाहीं; परवां नुकते आनंदरावानीं पदरचे हजार रुपये मोजायचे कबूल करून देणेदारांचें तोंड बंद केलें तेव्हां तर तूं होतासच. त्या दिवशीं देखील बाईसाहेबांनीं आनंदरावाच्या ह्मणण्याला रुकार दिला नाहीं—

काळ्या—मग इचिभन कालच्या कालचं काय झालं तर! यका घटकच्या आंत! का भुतखेळ झाला का काय?

कोंडाऊ—भुतखेळापेक्षां अधिक. ऐक तर खरें. काल सकाळीं आनंदराव नेहमींप्रमाणें आले, बसले; तूं बाहेर निघून गेलास. मुलगा माडीच्या कठड्याशीं उघड्या अंगानेंच खेळत होता. मी मागच्या दारीं कांहीं काम करीत होतें.

काळ्या—तूं तकड होतीस, ह्यो हकड व्हता, ह्ये कुनाला व्हांव. झोर सांग—

**कोंडाऊ**—पुनः आणखी आपलें तेंच. कुणी कांहीं सांगत असलें ह्मणजे मधें मधें तोंड घालूं नये.

**काळ्या**—व्हायल.

**कोंडाऊ**—मुलाला घालायला अंगरखा आणायचें निमित्त काढून बाईसाहेब तिथून उठून आंत गेल्या. बराच वेळ वाट पाहून, आनंदरावही घरीं जावें ह्मणून जिना उतरून चौकांत गेले. इतक्यांत 'अगबाई! मुलगा पडला. कोंडाऊ धांवग धांव' अशी बाईसाहेबांची किंकाळी ऐकून आनंदरावांनीं वर पाहिलें तों मुलाचा तोल जाऊन तो खालीं पडत होता, त्याला आनंदरावांनीं झटपट् धांवून वरचेवरच झेलला. हें पाहिल्याबरोबर बाईसाहेबांना जो आनंद झाला तो काय पुसूं नकोस. त्या आनंदाच्या भरांतच बाईसाहेब आनंदरावाला ह्मणाल्या कीं, तुह्मी माझा प्राण मला परत दिलात तेव्हां हा देह आजपासून तुमचा झाला. हें करून सुद्धां तुमच्या आजच्या उपकाराची फेड व्हायची नाहीं. हे शब्द ऐकून आनंदरावाला तर स्वर्गसुख एकदम हातीं लागणार, असें झालें. झालें संपलें तुझें विचारणें?

**काळ्या**—बग इचिभन! कंच काम सादायच झाल मंजी अस एका खिनांत सात्त. नारायनाचं करनन् दुसर काय! पन् इक्ती घाई कां क्येली? ह्मोर चार रोजान म्होतुर बगितला असता तर!

**कोंडाऊ**—आनंदरावाला जोशीबुवांनीं सांगितलें कीं, पुढें मुहूर्त नाहीं, सिंहस्थ लागतो. कालचाच शेवटचा—( इतक्यांत दुर्गा कोंडाऊला हाक मारते. ती 'ओ' ह्मणून उठून जाते. काळ्याही जातो. )

# प्रवेश २ रा.

स्थळ—जिवाजीराव कुंभ्यांचा वाडा.

पात्रें—जिवाजीराव व त्याचा पुत्र तुळाजीराव.

**जिवाजीराव**—काय ह्मटलेंस? तिचें आणि त्याचें लग्न झालें? कधीं? कुठें?

**तुळाजी०**—इथेंच काल संध्याकाळीं गोरज मुहूर्तावर झालें. मला तरी नुक्तेंच समजलें हें. आतांच मी घोड्यावर बसून अस्सा वयनी रहाते त्या वाड्यावरून येत होतों, तेव्हां तिथें मार वाजंत्र्यांची गर्दी चालली आहे. माणसांची एकच धांदल उडाली आहे. कुणी आंत जातो, कुणी बाहेर येतो. हें पाहून सहज शोध केला तों हें प्रकरण! काय सांगूं बाबासाहेब त्या वेळीं मला फार वाईट वाटलें, व आंगाची लाही झाली, पण काय करूं? तोंड खालीं करून मुकाट्यानें इकडे निघून आलों.

**जिवाजी०**—यांत मला आधीं हें चमत्कारिक वाटतें कीं तेनें कबूल केलें कसें! दुर्दैव त्या आनंदरावाचें झालें.

**तुळाजी**—पुष्कळ दिवस वाटत होतें, आणि ह्मणे, एवढें मात्र एक ठरलें आहे कीं, तिनें आपला वाडा सोडायचा नाहीं. आनंदरावानेंच तिथें जाऊन रहावें.

**जिवाजी**—जाऊं देत, दोघेंही मरूं देत शिनळीचीं!

**तुळाजी०**—त्यांचें कांहीं फार दिवस पटायचें नाहीं, हें मी खात्रीनें सांगतों, आतां जरी तो आनंदाच्या शिखरावर असून स्वर्ग काय तो त्याला अगदीं दोन बोटें उरला आहे, तरी चार दिवस जाऊं द्या कीं तो पडलाच खालीं ह्मणून समजा. पुढें त्यांचें त्यालाच वाटायला लागेल कीं यांत कांहीं अर्थ नाहींरे नाहीं, कारण, ती स्वतःच्या हौसेनें

कांहीं त्याला कबूल झाली नाहीं, अशी मला बातमी लागली आहे, मग खरें काय तें तिला ठाऊक किंवा त्याला ठाऊक ! पण एवढें खास कीं, आणखी थोडक्याच दिवसांत ही गोष्ट त्याच्या मनांत टोंचायला लागून तो तिला कांहीं तरी भांडण काढून घरांतून हांकलून देणार !

**जिवाजी०**—तूं त्यांच्या लग्नाची गोष्ट मला सांगितलीस तेव्हांच माझ्या मनांत येऊन चुकलें हें. अरे, सांगून संवरून पाढऱ्या पायाची ती, तिचें कुणाशीं पटणार ! असो. पुढल्यास ठेंच मागला शहाणा, या ह्मणीप्रमाणें तूं मात्र अक्कल शीक. तुझ्या भावानें माझा शब्द मोडून पाहिजे तसे फंद केले ह्मणून त्याचा परिणाम काय झाला तो लक्ष्यांत आण, आणखी नीट माझ्याच तंत्रानें चालत जा. ह्मणजे परमेश्वराच्या कृपेनें तुला कांहीं कमी पडायचें नाहीं, समजलास ?

**तुळाजी०**—हें काय सांगायला पाहिजे मला ! दादानें जितकें तुह्मांला दुःख दिलें त्याच्या दसपट मी सुख देईन. तुमच्या हुकुमाबाहेर एक पाऊल देखील टाकणार नाहीं, हीच शपथ !

**जिवाजी०**—शाबास ! असा वागलास तरच माझ्या पोटीं येऊन सार्थक; नाहीं तर काय? असो; पण तुळाजीराव, तुझ्या भावावर जरी माझा अतिशय राग होता तरी आतां काय त्याचें ? तो मेला, गेला पार झाला. त्याच्यावरचा राग कांहीं त्याच्या पोरावर काढायचा नाहीं. त्या पोराची मला फार काकलूत येते. किती झालें तरी नातवंडच तें ! कां नाहीं येणार बरें?

**तुळाजीराव**—माझ्या मनांतून हें तुह्मांला कधींच विचारायचें होतें कीं, त्या बापड्या पांच वर्षांच्या पोरानें तुमचा काय अपराध केला ? त्या लेंकरावर तुमचा इतका

राग कशासाठीं ? पण ह्मटलें लहान तोंडीं मोठा घास घेऊं नये, ह्मणून उगीच राहिलों होतों. आतां तुह्मालाच त्याची दया आली बरें झालें.

**जिवाजी॰**—तेव्हां—काय रे ? हं—तेव्हां मी काय म्हणतो कीं, तू भविष्य केल्याप्रमाणें आनंदरावानें जर त्या साडेसातीला वाटेस लावली तर त्या अज्ञान लेंकराचे विनाकारण हाल होतील, आणखी माझ्याच्यानें ते ऐकवायचे सुद्धां नाहींत. तर त्याच्या नांवावर कांहीं थोडी जमीन वगैरे करून ठेवावी, किंवा त्याच्या नांवची कांहीं रक्कम——

**तुळाजी॰**—पण बाबासाहेब—आपल्या खऱ्या नातवंडांची काळजी बाळगून, अशी व्यवस्था करून ठेवणें कांहीं वाईट म्हणत नाहीं मी——पण त्या मुलाविषयीं लोकांत कुजबुज ऐकली ती आपण आपली तुमच्या कानावर घालतों. ह्मणजे——

**जिवाजी॰**—कसली रे कुजबुज? मूर्ख आहेत लोक.

**तुळाजी॰**—मी नाहीं त्यांना मूर्ख ह्मणायचा. कारण, दादांचें आणखी तिचें लग्न झालें, त्यापूर्वीच आनंदरावाचें तिच्या घरीं जाणें येणें असे. तेव्हां त्याचा आणि तिचा कांहीं चमत्कारिकच थट्टामस्करीचा प्रकार पाहून, तिच्या बापानें आनंदरावाच्या देखत 'एवढी थोरली झालीस तूं ! आणि पुरुषांबरोबर काय अंगमस्ती करतेस?' असें ह्मणून दोनचार वेळां तिला दरडावलें. असें झालें तेव्हां त्यानें तिथें जाणें बंद केलें.

**जिवाजी॰**—बरें मग? मुलाविषयीं कुजबुज करतात ती कोणती?

**तुळाजी॰**— बाबासाहेब, मला सांगायला शरम वाटते. वयनीला लग्नापूर्वींच एकदोन महिने गेले होते असें ह्मणतात.

**जिवाजी॰**—( रागानें ) तूं आहेस एक मूर्ख, आणि

असें म्हणणारे लोक आहेत शतमूर्ख ! अरे त्या मुलाचा तोंडवळा आणखी चंद्रावाचा तोंडवळा अगदीं सारखा दिसतो, हें नाहीं वाटतें तुझ्या लक्ष्यांत आलें?

तुळाजी०—( बाप रागावला असें पाहून ) हो हो ! तें कधींच मीं पाहिलें आहे, इतकेंच नव्हे, तर तुमच्या आणि त्याच्या, माझ्या आणि त्याच्याही चेहऱ्यांत साम्य दिसतें, पण लोक काय म्हणतात तें मी तुम्हांला कळविलें.

जिवाजी०--( संतापून ) झक मारतात लोक ! मी आतां अगोदर माझ्या नातवाची कांहीं तरी तरतूद करून टाकतों. वास्तविक ह्मटलें ह्मणजे माझ्या मागें तो निम्याचा मालक. परंतु त्या साडेसातीच्या पोटीं आला ह्मणून त्याची चवथाई तुडवून बाकी चवथाईचा मालक त्याला करतों, आणि तुला तीन हिशांचा. जातों तर. आतां त्याच उद्योगाला लागतो. ( असें ह्मणून निघून जातो. )

तुळाजी०—( आपल्याशीं ) हें पाहिलें ! तें कारटें मला बाधक होणार म्हणून म्हणत होतों, तो प्रसंग शेवटीं येऊन ठेपलाच ! ( वेडावून दाखविल्यासारखें करून ) ‘ त्या पोराची मला काकूत येते !’ वः बाबासाहेब ! तुमच्या कोमळ अंतःकरणाची कमाल आहे ! ! परमेश्वरानें मनुष्य तरी एक विचित्र प्राणी निर्माण केला आहे. प्रत्यक्ष त्या पोराची आई किती पायां पडली, किती काकुतीला आली, किती रडली ! तरी या फत्तराला तिची दया आली नाहीं. कां? तर ह्मणे ती पांढऱ्या पायाची आहे, तिनें माझें घर बसविलें ! आणि त्याच साडेसातीच्या पोटचें हें कारटें असून त्याच्या साठीं आमच्या बाबासाहेबांचें मन कळवळतें ! काय चमत्कार आहे पहा ! पण मी आतां कशाला बोलूं? ह्मातारा काय काय करतो तें करूं दे. त्याच्या अकलेवर हिकमत लढवायचें काम माझें ! मी जो एकदा व्यूह रचला

आहे तो चवथा हिस्सा त्या पोरट्याला देण्याकरितां नव्हे ह्मणावें—बरें, आतां आपल्याला अगोदर आनंदरावाकडे पानसुपारीला गेलें पाहिजे. कारण, मित्रत्वाची वरवर रेलचेल करून आपला मतलब साधून घ्यायला आपलें काय जातें ? अंदरकी बात राम जाने ! ( असें ह्मणून निघून जातो. )

## प्रवेश ३ रा.

स्थळ—दुर्गाच्या वाड्यांतील दिवाणखाना.

( एका बाजूस कलावंतिणीचा नाच चालला आहे. दुसऱ्या बाजूस आनंदरावाचे कांहीं मित्र बिछायतीवर लोडाशीं टेंकून बसले आहेत. वरचेवर पानसुपारी, अत्तर गुलाब चालला आहे. आनंदरावाचे मित्र मधून मधून हळूच त्याची थट्टा करीत आहेत, व तोही त्यांस आनंदानें उत्तरें देत आहे. अशा वेळेस तुळाजीराव प्रसन्न मुद्रा करून लगबगीनें येतो. सर्वजण त्यास 'या या,' ह्मणून योग्य ठिकाणीं बसवितात. त्यास अत्तर गुलाब वगैरे दिल्यावर लौकरच नाच बंद होतो. )

**आनंद०**—वः तुळाजीराव ! अगदीं आज वेळेवर आलांत ना ? तरी मित्र ! तरी सांगून ठेवलें होतें !

**तुळाजी०**—झाला खरा बुवा थोडासा उशीर. पण इलाज़ नाहीं. अगदीं यायला निघालों, आणि बाबासाहेबांच्या पोटांत जी तिडीक उठली ह्मणतां—

**आनंद०**—( मध्येंच ) हा सर्व प्रकार त्यांना कळला का ?

**तुळाजी०**—होय. कालच कळला.

**आनंद०**—तरीच तिडीक उठली बरें का !

**तुळाजी०**—( हंसून ) छे छे ! मग मी तसाच वैद्यबु-

वाकडे गेलों. त्यांनीं मात्रा दिली ती उगाळवून बाबासाहेबांना देवविली. तेव्हां त्यांची तिडीक दबली, आणि मी इकडे आलों. ह्मणून जरा उशीर झाला. नाहीं तर अशा वेळेला का मी राहिलों असतों !

आनंद०—काय राहिलों ह्मणतां ! दुसरें काय, तुह्मी असतां ह्मणजे तितकी मजा झाली असती.

तुळाजी०—अहो, आतां काय मजेला कमी ! ( हळूच ) मजेचें झाडच तुमच्या हातीं लागलें आहे. सांगितलें तर तुम्हांला खोटें वाटेल, पण पोटांत मावत नाहीं ह्मणून सांगतों कीं, या विवाहाबद्दल तुमच्यापेक्षां देखील मला अधिक आनंद झाला आहे !

आनंद०—यांत मोठें नवलच सांगितलेंत ! जिवलग मित्राला जर आनंद होऊं नये तर व्हावा कोणाला ? माझें सुदैव आणि तुमची खटपट, मग काय कमी ?

तुळाजी०—खटपट कसली त्यांत ? बरें, जरी केली तरी काय परक्यासाठीं केली ? परंतु हें पहा तुह्मांला आनंदराव हें नांव आतां खरें शोभूं लागतें.

आनंद०—खरेंच ! ( हंसून ) आणि दुसरीही तशीच गंमत पहा कीं, तुमच्या वयनीचें—आतां दुहेरी वयनीचें—पहिलें नांव दुर्गा. ह्मणूनच एकादा दुर्ग हस्तगत करून घ्यायला जितके प्रयास पडतात त्याच्यापेक्षां सात पट प्रयास ही दुर्गा हस्तगत व्हायला पडले !

तुळाजी०—मी तुम्हांला सांगत नव्हतों कीं, पाठ सोडूं नका. सात वर्षें आराधना केलीत, पण शेवटीं प्रसन्न करून घेतलीत. ( इतक्यांत भोजनाची तयारी झाल्याची वर्दी आल्यावरून सर्वजण उठून जातात. )

# प्रवेश ४ था.

स्थळ—दुर्गाच्या वाड्यांतील एक खोली.

पात्रें—काळ्या ( भडक पोषाक केलेला ) व कोंडाऊ.

**काळ्या**—ह्यो मातूर आमास्नी लइ नामी धनी घावला बग! झोरल्या म्हैन्याला साच बारा रुपइ व्हनार असं माझ्या होन्यामंदीं आलया. थोकच दिस झाला. पन दिल् अक्शी नामी दिसतुया. ह्ये मला लग्नाच मुंडास बांधल, ह्यं धोतराच पान आपल्या हातान माज्या अंगावर घातल. आनी चाकरमानूस, पन अमासंगची गुळावानी गुळमट बोलून. बाईसाएबांचा मातुर नूर वाइस न्यारा दिसतो. या. परक्यावानी परक्यावानी करत्याती. त्येंच जर का मन खुस झाल तर आमावानी खुसमौज आमीच बग.

**कोंडाऊ**—त्या हंसा खेळायला लागल्यावर रावसाहेबांना आणखी काय पाहिजे?

**काळ्या**—दोन रोज वाइस बिचाकल्यावानी करत्याल, झोर आपमुक वळनावर येत्याल बग.

**कोंडाऊ**—बरें, कारे जिवाजीरावांनीं तुला वाड्यांतून हांकलून दिलें तेव्हां तूं ह्मणत होतास कीं, त्यांनीं माझा गळा कापल्यासारखें केलें. तर ते पुनः तुला चाकरीला ठेवतात, जातोस का? इथल्यापेक्षां जास्त पगार मिळेल बघ?

**काळ्या**—नगर दादा! उपाशी म्येलो तरी बी फिकीर न्है, पन् तत जान नग आता. तवादरन म्या न्योमच करून टाकलाया, घरीं बाइल असल्या बिगार आगी लंड पिची लंड अशा सडकसीतारामाजवळ परान ग्येला तरी बी चाकरी न्हायाचा न्है!

**कोंडाऊ**—तें कांरे?

**काळ्या**—अशा मानसास्नी कदी चैनचं न्है बग. ज-

वातवा पिसाळल्या कुत्र्यावानी अंगावर खिसाकत्यात. इ-ळमर गडीमानूसाची आईमाई काडत्यात. कामाची बी लइ घासगीस. ह्येच यकांदी चटकदार बायकु असली मंजी येळ सारा खुममौजमंदी असत्यात. त्यो म्हातारा मला कस ह्मंतो ( जिवाजीरावाप्रमाणें बोलून व मुद्रा हातवारे करून)"जा तिकडच. पुना ह्यो उंबरा चढलास तर पाय मोडीन, अस-ल्या म्हन मंगरूर चाकराची मला जरूर न्हे!" बग कीं, आं? मग असल्या पिसाट धन्याची हत कुना ल्योकाला अगत हे. रागारागान माज कांबळ फेगकुन दिल, आन् मला रटच्याला धधरून वाड्याभाइर घालिवल. का कसा हे ह्मातारा! ह्योच जर का तरना असता तर मला जिवची मारल असत!

कोंडाऊ—तरी म्हातारा बरें! ह्मणूनच सांगतात ना कीं, तरण्यातांठच्या पुरुषांनीं बायका करून असावें. तींच लग्नें झालीं नसलीं कीं, इकडे धांव, तिकडे धांव, इथे हुंग, तिथे हुंग असें करायला लागतात. खरेंच काळ्या, अजून तूं कारे बायको केली नाहींस?

काळ्या—हुं! बायकु करतो! बायकु झाडाला चिकाट-लिया जनु! का शेनामातीची करु! बायकुला रुपई लाग-त्यात गाडगभर. त्यापाइ कुट दरुडा घालू व्हे? आन् न्हे ह्येवी बेस हे तिचीभन. न्हे तर मी ध्याचावी हतच व्हानार, आन् राच्चावी हतच व्हानार. आन् ती व्हानार तत. कस जुळतया? तिन तकड रंग मारावा, आन् म्या हकड—( कोणी आलेंसे पाहून ) अग रावसाब येत्याती. धाई दिसातिया. वाइसायबाकड जात्याती जनु. चल आपुनवी कामाला लागू. ( असें ह्मणून जातात. )

# प्रवेश ४ था.

**स्थळ**—दिवाणखान्याची खोली.

**दुर्गा**—( मनाशीं ) अविचार ह्मणजे दुःखाचें माहेर असें जें ह्मणतात तें मेलें कांहीं खोटें नव्हे. आनंदरावांनीं माझ्या बाळयाचा प्राण वांचविला, त्याबद्दल आनंदाच्या भरांत मीं त्यांना आपली काया अर्पण केली. हें माझें करणें चांगलें कीं वाईट याचा मला त्या वेळीं कांहीं विचार झाला नाहीं. पट्कन् तोंडांतून शब्द निघून गेले. बरें पण माझ्या हातून तें पाप झालें कीं काय ? पाप ह्मणावें तर आनंदरावाचे उपकार फेडायला मला दुसरा उपायच सुचला नाहीं त्याला मी तरी काय करूं ? ( किंचित् विचार करून ) बरें, केलें तें जर चांगलें ह्मणावें तर मनाला रुखरुख कां लागली आहे ? बोलतें चालतें पण कालपासून चैन नाहीं. मी कांहीं तरी मोठें पातक केलें असें राहून राहून मनांत येतें. आणखी तेंही मेलें खरेंच. कारण, हें शरीर दुसऱ्याला देणार मीं कोण ? याचे धनी दुसरेच आहेत—होते कां होईना—पण ( इतक्यांत आनंदराव घाईघाईनें येतो. दुर्गा उभी राहते. )

**आनंदराव**—( सचिंत ) मला आत्तांच्या आत्तां निघालें पाहिजे. हें पहा त्याचें पत्र. त्याचे नुसते हाल चालले असतील. जीव घुटमळत असेल. मला पाहिल्याशिवाय त्याचा प्राण सुखांत जायचा नाहीं.

**दु०**—असें मेलें एकाएकीं काय झालें असावें बाई ! तिकडे तो मोठा उपद्रव तर नाहींना मेला ?

**आनंद०**—तें कांहीं लिहिलें नाहीं. पण मला भेटण्याकरितां येत होता. अमीरपूर सोडून दुसऱ्या मुक्कामाला

आला तोच अगदीं जेर होऊन पडला. एका गड्याशिवाय दुसरें कोणीच जवळ नाहीं. दुसरा गडी होता तो पत्र घेऊन इकडे आला. मला तर आतां गेलेंच पाहिजे. पण तुला सोडून जायचें ह्मणजे प्राणच सोडून जायचें असें मला झालें आहे. काय करूं ?

दु०—खरेंच. ते वाटेंत आजारी पडले, हें कांहीं मेलें चांगलें नाहीं झालें.

आनंद०—असो, इलाज नाहीं. पण एक गोष्ट माझ्या मनाला खाते. ती ही कीं, कालपासून मी तुझें तोंड हंसरें असें केव्हांच पाहिलें नाहीं. विनोद नाहीं, गोड बोलणें नाहीं, कांहीं नाहीं; ह्मणून माझें धैर्य जास्त खचतें. ( इतक्यांत तुळाजीराव येतो. )

आनंद०—कां, मंडळी गेली का ? त्यांना सोडून तुह्मी कसे आलांत इकडे ?

तुळाजी०—तर काय करूं ? पत्र वाचतांच वाईट तोंड करून उठून आलांत, तेव्हां त्यांत कांहीं आनंदाची खबर नाहीं असें समजून मंडळी उठून गेली; ह्मणून काय प्रकार आहे तो पाहण्याकरितां मी इकडे आलों. पण कोणाकडून आलें पत्र तें ? कांहीं—

आनंद०—ध्यानीं मनीं देखील नव्हता असा अनर्थ येऊन कोसळला. हें पहा वाचून.

तुळाजी०—( पत्र वाचीत ) काय **गुणाजीराव** बेमार आहेत ! अरे अरे अरे ! ! तुह्मांला भेटायला येत होते ? काय पहा नशीब ! मग तर आतांच तुह्मांला घोड्यावर बसलें पाहिजे ?

आनंद०—हो, सामानसुद्धां चढवायला सांगितलें. गुणाजीरावांसारखे भाऊ मिळणार नाहींत, तुळाजीराव !

तुळाजी०—पण वयनीचा रुकार पडला का ? कां वयनी ?

दु०—गेलेंच पाहिजे ह्मणतात. मी कशी नको ह्मणूं ?

आनंद०—हें शरीर जाणार, पण प्राण मागें रहाणार !

तुळाजी०—तुमच्या बंधूंची प्रकृति बरी असली तर ताबडतोब यालच त्यांना घेऊन; नाहीं तर—( इतक्यांत मोतद्दार घोडा तयार आहे ह्मणून सांगून जातो. )

आनंद०—बरें तर येतों आतां हं. तुळाजीराव, तुह्मी तर भावासारखेच आहांत, तेव्हां जास्त काय सांगायचें ! मी परत येईपर्यंत इथें तुमचा बंदोबस्त. माझा प्राणच तुमच्या स्वाधीन आहे असें समजा ह्मणजे झालें.

तुळाजी०—त्याची तुह्मीं बिलकुल काळजी करूं नका. ( एकीकडे ) तुमचा प्राण माझ्या स्वाधीन आहे हें मी कधींपासूनच जाणून आहें. ( आनंदराव निघाला. त्यास पोंचविण्याकरितां दुर्गा जाऊं लागली. )

आनंद—नको नको. थंडी फार आहे. कशाला येतेस बाहेर ? जा, जाऊन नीज जा. कुणी पोंचवायला आलें ह्मणजे परत यायला उशीर लागतो. खरेंच, जा. मी बहुतकरून उद्यांच येतों परत.

दु०—बरें, नीट संभाळून चला. रात्रीची वेळ आहे. वाटही नीट नसेल—

आनंद०—छे छे ! आतां चांदणें पडेल. भीति नको वाळगूं. ( असें ह्मणून तुळाजीराव व आनंदराव निघून जातात. )

दु०—अग बाई ! माझें मन एकाएकीं असें उदास कां बरें झालें ! आणखी मेलें कांहीं अरिष्ट यायचें आहे कीं काय कोण जाणे ! मी मोकळ्या मनानें वागत नाहीं, ह्मणून आनंदरावांना फार वाईट वाटतें खरें; पण मी तरी काय करूं ? मनाला मेली कसली ती हौसच वाटत नाहीं. माझ्या मनांत कांहीं कपट असलें तर देवा ! त्याला तूंच साक्षी

आहेस. बरें, पडतें आतां जाऊन अंथरुणावर. घटकाभर डोळा लागला तर तेंव्हढेंच बरें वाटेल मनाला. ( निघून जाते. )

( अंक तिसरा समाप्त. )

---

# अंक ४.

## प्रवेश पहिला.

स्थळ—रस्ता.

पात्रें—चंद्रराव ( दुर्गाचा पहिला नवरा )

व सोमाजीराव ( त्याचा मित्र. )

**चंद्रराव**—दिवस कितीही मोठा झाला, आणखी सूर्याचा ताप कितीही प्रखर असला, तरी शेवटीं आनंददायक सायंकाळ हा व्हायचाच—तसा आमचा प्रकार झाला. आज सुमारें सात वर्षें आपण कैदेंत कष्ट भोगले, पण अखेरीस भोक्तृत्व संपतांच तशा विकट ठिकाणांतून देखील आपली अकस्मात् सुटका होऊन, आपण पुनः घरीं आलों कीं नाहीं ?

**सोमाजी०**—ज्या दिवशीं आह्मीं त्या शिपायाला ठार करून तटाची भिंत उडून खालीं मैदानांत आलों, त्याच दिवशीं आपण घर गांठलें. बरें, हाच गणेशपेठेचा रस्ता नव्हे का ? मी जातों तर आतां. त्या वडाच्या पलीकडेच आमचा वाडा, पण तुह्मी कुठे जाणार ? वडिलांकडेचना ?

**चंद्रराव**—छे ! अधींच माझ्यावर त्यांचा राग, त्यांतून तुटाजीरावांचीं पत्रें तुह्मीं वाचीतच होतां. तेंव्हां तिकडे जाण्यांत कांहीं अर्थ नाहीं, पण कांहो सोमाजीराव, इतक्यांत या माझ्या बैराग्याच्या वेषावरून मला पाहिल्या बरोबर कुणी ओळखील का ?

**सोमाजी०**—मला तर वाटतें कीं, साधारणपणें कांहीं

कुणाला ओळखतां यायचें नाहीं, अगदीं संघट्टणांतीलच कुणी मनुष्य असेल तर सांगवत नाहीं. खरेंच, वैरागी पण हुबेहूब वैरागी दिसतां !

चंद्रराव—तुह्मी चला आतां. माझ्या नवीन बिऱ्हाडाचा पत्ता ह्मणजे मुरलीधराच्या मंदिराजवळ—उजव्या बाजूला कोपऱ्यावरचा दुमजली वाडा—

सोमाजी०—आला लक्ष्यांत सकाळीं येतों मी तुमच्या कडे. ( सामाजीराव जातो. चंद्रराव कांहीं वेळ फिरून आपल्या वाड्यानजीक येतो. )

चंद्रराव—हा दिवस कधीं येईल असें झालें होतें तो एकदां आला. आतां माझ्या मनांत आहे त्याप्रमाणेंच जर इथली सर्व व्यवस्था ठीक असली, तर माझ्या आनंदाला पारावारच नाहीं. मग इतके दिवस भोगलेलीं दुःखें एका क्षणांत विसरून जाऊन मोठ्या सुखांत राहीन. ( दरवाज्यानवळ येऊन दरवाजा खडखडावतो, व ' कोण आहे ? कडी काढा ' असें ओरडतो. कोणी आलें आहे असें पाहून काळ्या उठून पहाण्याकरितां येतो. )

काळ्या—आं! कोन है स्ये ?

चंद्रराव—दरवाजा तर उघड आधीं, मग सांगतों.

काळ्या—( दरवाजा उघडून बाहेर येत येत ) इचि भन ! चाकरी नव्ह, कार है ह्या ! वाइसा कुट डोळा लागतोया त्यो ' दार उगड.' है काय ह्ये ? ( चंद्रावास ) कोन् हैस तूं ?

चंद्रराव—तुझ्या धनिणीला झोंप लागली का ?

काळ्या—( नीट न्याहाळून पाहून ) अर ह्यो कोन् गोसावडा है. कार! इक्त्या राच्च का आलास भिक मागायला ?

चंद्रराव—( आपल्याशीं ) हा कुणी नवाच चाकर ठेवल्यासारखा दिसतो. ( उघड ) अरे बाबा मी गोसावी

दिसतों, पण खरा गोसावी नव्हे; माझें एवढें काम कर ह्मणजे वास्तविक प्रकार तुला आपोआप कळेल.

**काळ्या**—( डोलानें ) अर चल ! मोटा ल्योक आला-या काम सांगायला ! अमिराचा नातू ! सकाळच्या पारीं ये, मंजी वंजळभर आटा घालीन जा. ह्येच ल्येका तुंज काम, आन् दुसर कंच असतया. जा, पड जा धरमसाळंत जाऊन. ( असें म्हणून दार लावूं लागतो. )

**चंद्रराव**—अरे, तुला एक रुपया देतों हा घे, आणि तुझ्या बाईसाहेबांना जाऊन माझा निरोप कळीव. त्यांना ह्मणावें, कांहीं जरूरीच्या कामाकरितां तुम्हांला कुणी भेटा-यला आला आहे. ( रुपया काढून देतो. )

**काळ्या**—( रुपया फेंकून देऊनें ) कार ये गोसावड्या ! मला का कुत्र्यावानी समजलास व्हय ? योक भाकरीचा तुकडा फयेकला मंजी त्यो गप बसतुया. मी तसा न्हव. जा गुमान आपल्या वाटन. इक्त्या राच्च आमच्या बाईसाब कुनाची गाठ घेत न्हाइत. चल—ढूंवांग लावलया तत. ( त्याच्या हाताला धरून दूर घालिवणार इतक्यांत कोंडाऊ येते. )

**कोंडाऊ**—हं ! कुणाशीं हुजत घालीत बसला आहेस तो? थोडकें बोलून काम होत नाहीं वाटतें ? तुला किनई, ज्याच्या त्याच्याशीं वटवट करायची फार संवय लागली आहे. कोण आलें आहे तें ? ( चंद्रराकडे न्याहाळून पाहून ) कां बुवा, इतक्या रात्रीचे कुणाकडे आलांत ? काय काम आहे ? कुणाशीं बोलायचें आहे ?

**चंद्रराव**—बाई तूं केलेंस तर तुझ्याकडेच आहे. मला तुझ्या बाईसाहेबांची गांठ घ्यायची आहे.

**कोंडाऊ**—पहातें बरें त्यांना विचारून. पण बाईसाहेबांची गांठ घेतलीच पाहिजे का ? काय काम आहे तें माझ्या हातून नाहीं का होण्यासारखें ?

चंद्रराव—( हिरमुसलें तोंड करून ) होईल, पण मला हवें तसें नाहीं व्हायचें. बरें, ही आंगठी नेऊन दाखीव ह्मणजे काय काम आहे, तें त्यांना समजेल. ( आंगठी काढूं लागतो. )

कोंडाऊ—( आपल्याशीं ) हा कुणी गोसावी दिसतो आहे; पण बोलण्यावरून कांहीं गोसाव्यासारखा वाटत नाहीं. मग काय असेल तें ईश्वराला ठाऊक! ( आंगठी घेऊन ) मेली ही आंगठी मारली बिरलेली नसेल ना? नाहीं तर काय ह्मणतात कीं नाहीं त्यांतली गत. करायला जावें एक, आणि व्हायचें भलतेंच. ( चंद्ररावास ) या आंगठीवर कांहीं भलतेंसलतें नाहींना लिहिलेलें? तुझ्या तोंडावरून कांहीं तसें दिसत नाहीं ह्मणा, पण आपलें विचारलें! थांब थोडासा. मी ही त्यांना दाखवून आणतें.

काळ्या—( चंद्ररावाकडे साशंकपणें पाहून मोठ्यानें ) अग या गोसावड्याचा कावा काइ न्याराच दिसतोया बर का! काय अदिक उन झालं तर मला दकल न्है बग हां! त्येच्या वकोत हाय, ती आंगठी दावाय न्हेउ नगस. म्होर म्या सांगितल न्है म्हनूशील!

कोंडाऊ—बरें, सांगितलें होतेंस ह्मणोन, झालें? ( निघून जाते. काळ्या चंद्ररावाकडे टवकारून पहात दरवाज्यांत उभा रहातो. )

चंद्रराव—( आपल्याशीं ) ही आमची म्हातारी कुळंबीण! इनें कांहीं मला ओळखलें नाहीं. हा गडी तर नवाच आहे ह्मणा. या दोघांची ही सावधगिरी पाहून मनाला आनंद होतो. आतां थोडा अडाणीपणा करतात, पण तो देखील मी एका अर्थी चांगलाच ह्मणतों. ( इतक्यांत कोंडाऊ येते. तिला पाहून ) कां? कसें काय झालें?

**कोंडाऊ**—मी ती आंगठी दिली त्यांच्यापाशीं. कांहीं वाईट वर्तमान आणलें नाहींस एवढें एक बरें केलेंस.

**चंद्रराव**—वाईट तर नाहींच नाहीं. ती आंगठी पाहून त्यांना फार आनंद झाला असेल.

**कोंडाऊ**—हो, झाल्यासारखा दिसला खरा. पण आंगठी पहातांच बाईसाहेब एकदम चपापल्या. मग काय असेल तें असो. बरें, आंत ये अगोदर, मी दरवाजा लावतें. किती झालें तरी मी मेली कुळंबीण पडलें, ह्मणून ह्मणतें कुणी पाहिलें तर उगीच भलतीच शंका घ्यायचे. मी पुनः त्यांच्याकडे जाऊन त्या काय म्हणतात तें तुला कळवितें. तोंपर्यंत तूं सदरेवर बैस म्हणजे झालें.

**चंद्रराव**—तरी चालेल. ( ती जाते. ) देवा! केव्हां एकदां जाऊन कडकडून आलिंगन देईन असें झालें आहे. आणखी दहापांच पळांनीं मी आनंदाच्या कळसावर जाऊन बसेन नाहीं! परमेश्वरा, धन्य आहे तुझी! माझें मन आणि शरीर जशीं काय सज्जच होऊन बसलीं आहेत. ( जातो )

---

## प्रवेश २ रा.

**स्थळ**—दुर्गाच्या माडीवरील दिवाणखाना.

( हातांत आंगठी असलेली **दुर्गा**. )

**दुर्गा**—( मनाशीं ) आजपर्यंत जादूगिरीच्या, मणीमंत्राच्या, तशाच छांछूच्या मी पुष्कळ गोष्टी ऐकल्या आहेत. मारलेला ताईत दंडाला बांधून, नाहीं तर मेली कांहीं तरी जादू करून, हे मांत्रिक लोक पाहिजे त्याला मोहनी घालतात, आणि आपल्याला पाहिजे तें त्याच्यापासून घेतात. तसेंच, मंत्र जपून भलत्याच दिवशीं चंद्रसूर्याला ग्रहणें सुद्धां लावतात, एक का दोन? असे पुष्कळ चमत्कार

घडतात ह्मणून आमची आजी लहानपणीं सांगत असे. तेव्हां “ असें कसें होईलग! उगीच कांहीं तरी सांगतेस? ” असें ह्मणून मी तिला हंसत होतें. पण आतां तें मेलें सगळें मला खरें वाटायला लागलें. हेंच पहाना! ही एवढीशी आंगठी! पण इच्याकडे पाहिल्याबरोबर पूर्वीं भोगलेलें सर्व सुख कसें माझ्या डोळ्यांपुढें उभें राहिलें! ( जरा चपापून ) अगबाई! ( एकसारखें त्या आंगठीकडे पाहून ) ही हातांत घेतल्यापासून माझ्या मनांत नाहीं नाहीं त्याच कल्पना येऊं लागल्या हं काय! एकदां आनंद झाल्यासारखें वाटतें, लगेच भीतिही वाटते! आतां—नको मेला, तो विचारच नको—( इतक्यांत कोंडाऊ येते. )

कोंडाऊ—तो बुवा सदरेवर उभा राहिला आहे त्याला काय सांगायचें?

दु०—खरें, तें मी विसरलेंच कीं! जा त्याला वर घेऊन ये. ( कोंडाऊ जाते. दुर्गा आपल्याशीं ) देवा! अरे ही त्यांच्या बोटांतली आंगठी इथें कशी आली? वाळापूरच्या लढाईत त्यांचा अंत झालाना? ( थोडा विचार करून ) आणि ह्मणूनच मी हें दुसरें लग्न केलेंना? छे बाई! ही आंगठी पाहिल्यापासून मरणाची बातमी खोटी कीं काय असें वाटायला लागलें आहे. ( सुस्कारा टाकून ) देवा! ते लढाईत पडले अशी मनाची कशी तरी समजूत घालून मी पुढचे दिवस काढूं कारे! ( किंचित् विचार करून ) नाहीं त्यांचा अंत झाला हेंच खरें. अंतकाळीं कुणी स्नेही जवळ असेल वाटतें, आणि मला पोंचवयासाठीं ही आंगठी त्याच्यापाशीं दिली असेल, तो ही घेऊन आला आहे, हेंच खरें. पण आलेला गोसावी—( चंद्रराव येतो. दुर्गा त्याच्याकडे न्याहाळून पाहून आपल्याशीं )

‘ मन चिंती तसें वैरी चिंतीना ’ असें म्हणतात तें कांहीं

खोटें नाहीं. उगीच मेल्या इतक्या वेळ मळमळल्या शंका घेत बसलें होतें. सर्व खुणा जमतात. देवा तेच हे ! ( आनंदानें ) माझा प्राणच मला मिळाला बाई !

चंद्रराव—( ती आपल्याशीं कांहींच बोलत नाहीं असें पाहून ) मला तूं ओळखलें नाहींस असें दिसतें !

दु०—कुणाला ? आपल्याला ओळखलें नाहीं !

चंद्रराव—( आनंदानें ) तर मग या वैराग्याच्या वेषाला निरोप देतों आतां. ( झोळी वगैरे फेंकून देतो. ) आज माझीं सर्व दुःखें संपलीं. एकदां कडकडून आलिंगन देऊं पहूं. ( असें म्हणून तिला धरावयास जातो. ती मोठ्यानें ओरडते, व नवऱ्याच्या हातांत सांपडतांच तिचें भान जातें. ) हें काय बरें ! ( वारा घालतो. ) लाडके ! लाडके ! शुद्धीवर ये. हा तुला कोण हांका मारीत आहे त्याच्याकडे पहा, ओ म्हण ! लाडके ! हा तुझा चंद्रराव आला आहे पहा ! मी दृष्टीस पडतांच हिला हा हर्षवायु झाला बरें ! मीच चुकलों. स्त्रियांचीं अंतःकरणें म्हणजे कोमळ असतात. त्यांना दुःखाचा किंवा हर्षाचा कोणताच वेग एकाएकीं सहन होत नाहीं, म्हणून मी या माझ्या लाडकीला एकदम भेटायचें नव्हे. असो. आनंदाच्या झटक्यानें हिचें भान जरी गेलें, तरी माझ्यावर हिची किती निःसीम प्रीति आहे, हें यावरून चांगलें कळून आलें. मनांत प्रीतीचा झरा नसतां नुसतें वरवर गोड बोलतां येतें. पण असा उमाळा फुटायला खरीच प्रीति लागते.

दु०—( बरळत बरळत शुद्धीवर येते. ) कुठें आहें मी ? तुम्ही त्यांची आणि माझी काय म्हणून ताडातोड केलीत ? मी त्यांचा स्वर ओळखला. माझा प्राण निघून जात होता, तो हा गोड स्वर ऐकून पुनः परत येत आहे. हेच ते. खास हेच. ( नवऱ्यास घट्ट मिठी मारून ) आतां नाहींना

कधीं या देहाचा अंतर पडायचा ? जर मेलें माझ्या नशि-बांत दुःख भोगायचेंच लिहिलें असेल, तर त्यापेक्षां मला इथें असेंच मरणें पुरवलें.

**चंद्रराव**—आतां दुःखाचें आणि मरणाचें नांवच घेऊं नकोस !

**दु०**—आपल्याला अवचित पाहून मला जो हर्ष झाला त्यानें मी अगदीं भांबावून गेलें आहें. मी काय बोलतें याची देखील मला शुद्धि नाहीं. ह्मणून ह्मणतें कीं, एखादा वेडावांकडा शब्द बोललें असेन तर त्याची क्षमा करावी.

**चंद्रराव**—( आनंदाच्या भरानें ) अहाहा ! तुला कुठें सांठवून ठेवूं असें झालें आहे मला !

**दु०**—बरें, मी विचारतें याचें अगोदर उत्तर द्यावें. आपण इथें कसे आलांत ? सांगावें लवकर सगळें. मला तर भ्रम पडल्यासारखें झालें आहे.

**चंद्रराव**—सर्व सांगेन बरें. पण आतां नको.

**दु०**—आह्मी इथें समजत होतों कीं, बाळापुरच्या लढाईंत—

**चंद्रराव**—समजलों. आणि तें कांहीं सर्वथा खोटें नाहीं. मी त्या लढाईंत जखम लागून पडलों होतों: पण आयुष्याची दोरी बळकट होती ह्मणून ह्मण, तुझ्या सौभाग्याच्या जोरानें ह्मण, अथवा परमेश्वराच्या मनांत ( तिच्या हनुवटीस हात लावून ) हें अनुपम सौख्य मला चिरकाळ द्यायचें होतें ह्मणून ह्मण, शत्रूच्या शिपायांनीं मला उचलून आपल्या छावणींत नेलें. पुढें सरासरी एक महिन्यानें माझ्या जखमा बऱ्या झाल्या; पण उपयोग काय ! मी बरा होतांच शत्रूंनीं मला कैदेंत टाकलें. तेव्हां इकडे यायचा बेत माझ्या मनांतच राहिला. तरी तिथून मी बाबांना दोन तीन

पत्रें पाठविलीं. परंतु कुणाचेंच उत्तर नाहीं, का निरोप नाहीं, कांहीं नाहीं.

दु०—त्यांतलें एक जरी पत्र मला पोचलें असतें, तरी केवढा अनर्थ ग्रात टळला असता म्हणून सांगूं!

चंद्रराव—( तिच्या बोलण्याचा खरा अर्थ न समजल्यामुळें ) तूं कांहीं जरी केलें असतें तरी माझ्यावरचा अनर्थ टळला नसता बरें! काय केलें असतेंस तूं?

दु०—मी काय केलें असतें तें आतां बोलून काय फळ! मेलें व्हायचें तें होऊन गेलें. पण मीं सगळीं दुःखें सोसलीं असतीं, कुणाची बटीक होऊन राहिलें असतें, निदान हें पोट जाळायला पोटच्या पोराला दिखील विकला असता बरें!

चंद्रराव—पोटच्या मुलाला?

दु०—हो. आपण खुशाल आहांत हें कळायसाठीं मी आपली मानसुद्धां वाहिली असती. आणखी काय?

चंद्रराव—( कुरवाळून ) बरें, झालें तें होऊन गेलें. आतां त्याबद्दल दुःख करून काय फळ! सध्यांच्या आनंदांत मात्र व्यत्यय येतो. पुनः आपली गांठ पडली, या सुखापुढें पूर्वी मीं सोसलेलीं सर्व दुःखें नाहींशीं झालीं. पुरे, उगीच मनाला वाईट वाटूं देऊं नकोस. भोक्तृत्व तेवढें सगळें भोगलेंच पाहिजे. एवढा परमेश्वराचा अवतार राम! त्याला देखील भोगानें चवदा वर्षे वनवास भोगायला लावला, मग माझी काय कथा? चल, आतां तुला अजून पुष्कळ गोष्टी विचारायच्या आहेत.

दु०—( आपल्याशीं ) देवा! माझे कान बहिरे होतील तर फार चांगलें होईल.

चंद्रराव—बरें, माझा बाळ्या कसा काय आहे? चांगला बोलायला लागला असेल नाहीं? आमच्या बाबांची प्रकृति कशी आहे? आणि तुळाजीराव?

दु०—सगळे खुशाल आहेत. (डोळ्यांतून पाणी काढून) मला जरी मामंजींनी लाथेनें झुगारून लावलें, तरी आपल्यावर ममता करोत एव्हढेंच माझें अंबाबाईजवळ मागणें आहे.

चंद्रराव—छे! हें काय? आता कां बरें डोळ्यांतून पाणी?

दु०—आज सात वर्षें माझ्या डोळ्यांना खळ नाहीं, रात्रंदिवस कपाळीं रडणेंच लागलें आहे मेलें!

चंद्रराव—मागचें जाऊं देग. आजपासून तूं सोसलेल्या दुःखांच्या दसपट तुला सुख देईन म्हणजे झालें कीं नाहीं? पण बाळ्या कुठें आहे? त्याला नाहीं का आणीत?

दु०—खोलीतच निजला आहे. (त्यास आणायला उठत.)

चंद्र०—नको. निजला असला तर निजूं दे. वाटेच्या श्रमामुळें मलाही आज फार झोंप येते.

दु०—येत असेल खरीच. बरें तर, मी जातें आणि सर्व तयारी करतें. ( जाते. )

चंद्र०—(आपल्याशीं) खरोखर हें एक रत्न आहे बरें! मी मोठा भाग्यवान् म्हणून ईश्वरानें हें माझ्याच हातीं दिलें! परमेश्वरा, मला पुष्कळ आयुष्य आणखी विपूल संपत्ति दे, म्हणजे या उपर मी हिला अणुमात्र देखील दुःख होऊं द्यायचा नाहीं. केवढी हिची योग्यता! हिच्या सद्गुणाला तर मोलच नाहीं. हिच्याकरितां मी जरी हजारों मोहोरांच्या ढिगावर लाथ मारली, तरी तें सुद्धां कमी होणार आहे. त्या माझ्या आंधळ्या, अभागी बापाला काय म्हणावें? प्रत्यक्ष कामधेनू आपण होऊन घरीं आली असून त्याला दिसली नाहीं—बाहेर घालविली! जाळ म्हणावें ते सोन्याचे ढीग. या साध्वीच्या पासंगाला सुद्धां पुरायचे नाहींत. माझ्या लाडकीच्या समागमाचें अनुपम सौख्य कुणीकडे—आणखी तुझे ते सोन्यारुप्याचे तुकडे कुणीकडे? मा-

ह्या पश्चात् हिचे काय काय हाल झाले असतील ! नको पण याविषयीं विचार करून उपयोग नाहीं. कारण, तिच्या विपत्तीला मीच कारण झालों असें मला शेवटीं कबूल करणें भाग पडतें. ( दुर्गा येते. )

दु०—सगळी तयारी करून आलें. जावें आतां निजायला.

चंद्र०—आणि तूं ?

दु०—मी भवानी देवीला नमस्कार करून येतें.

चंद्र०—बरें तर. लवकरच—( असें म्हणून जातो. )

दु०—( आपल्याशीं ) मी देवीला नमस्कार करून येतें ह्मणून म्हटलें, पण तिला मी आतां काय ह्मणून नमस्कार करूं ? ती मला काय देणार ? आशा करायसारखें उरलें आहे तरी काय ? कपाळीं होतें तेवढें मी सुख भोगलें. पण आतां माझी ग्रहदशा वाईट आली आहे. यापुढें मरेपर्यंत जिवाला मेले क्लेशच व्हायचे असें दिसतें. ( अंमळ विचार करून ) तरी क्लेश न सोसायचें माझ्या स्वाधीन आहे. मी देवीला नमस्कार करून येतें म्हणून त्यांना सांगितलें नाहीं का ? —पण ते म्हणजे कोण ? ते म्हणजे चंद्रराव— माझे पती. अं ! चंद्रराव माझे पती आणि मग आनंदराव हे कोण ? ( डोळे पुशीत ) नशीबा ! कारे माझ्यावर हा कठीण प्रसंग आणलास ? हेच जर चंद्रराव एकच दिवस अगोदर आले असते तर !—पण आतां अशीच रडत बसलें तर पुढें वाट काय ! कांहीं तरी मेली तोड काढली पाहिजे ना ? दोघांशीं लग्न केलें, पण खरी बायको कुणाचीच नव्हे, काय मेला हा कर्माचा खेळ तरी ! नकोरे देवा ! या विचारांनीं माझें कपाळ भडकून गेलें. खरी साडेसाती ग बाई ! ( किंचित् विचार करून ) बरें, असें केलें तर कसें होईल ? ह्मणजे लोकांचीं तीं मेलीं घालून पाडून बोलणींही सोसायला

--ोत, नी चहूंकडे माझ्या नांवाचा डंकाही व्हायला नको. शिवाय मेलें सुख कुणालाच नाहीं हो. असेंच करावें. एकदां मन घट्ट करून खुपसला कीं सुटलें. (विचार करून) मना, असें मागें घेऊं नकोस बाबा ! पण त्यांना एकदां शेवटचें डोळेभर पाहून घेतें, ह्मणजे या जिवाचा अधिक कंटाळा येईल; आणि मग (आकाशाकडे बोट दाखवून आवेशानें) यमाच्या घरची वाट—(इतक्यांत चंद्रराव येऊन)

**चंद्रराव**—"जिवाचा कंटाळा!" आणखी "यमाच्या घरची वाट" काय शब्द हे लाडके ! तुझ्या दुःखाचे दिवस गेले, ह्मणून मी सांगितलेंना मघांशीं ? पुनः काय बरें हें ? लवकर आली नाहींस ह्मणून तुला बोलवायला आलों, तों हे भयंकर शब्द कानीं पडले ! दहादां सांगितलें, आणखी एकदां सांगतों कीं, इतःपर तुझ्या स्वप्नांतसुद्धां तुला दुःख होऊं द्यायचा नाहीं.

**दुर्गा**—नाहीं हो ! मी संसारांतल्या दुःखांना भीत नाहीं. पण हीं मेलीं असलीं दुःखें सोसवत नाहींत. काय करूं मी ? माझी फार दैना दैना झाली बरें ! ह्मणून ह्मणतें कीं, यापुढें तरी माझी अशी फटवणूक व्हायला नको.

**चंद्रराव**—मी कधीं तुला फसविलें नाहीं, व पुढेंही माझ्या हातून तसें व्हायचें नाहीं. लाडके ! हें काय बरें ? वर पहा. तुझी प्रसन्न मुद्रा पाहूनच मला सुख होणार. नाहीं तर काय ?

**दुर्गा**—आपल्याला आनंद होईल, पण माझ्या कपाळीं दुःखाचा डोंगरचना ? पुढें काळ पहातें आहें. पण मरणाशिवाय मेली दुसरी तोडच दिसत नाहीं.

**चंद्र०**—या तुझ्या बोलण्याचा अर्थ काय ?

**दुर्गा**—लग्न सुखाकरतां करायचीं, असें शास्त्रांत सांगितलें आहे, मग मीच कां अशी कपाळकरंटी निघालें ह्मणतें !

चंद्रराव—माझ्याबरोबर लग्न केलेंस ह्मणून का तुझे हाल झाले ?

दुर्गा—हाल ह्मणजे किती म्हणून सांगूं ! मागें झाले ते झालेच. आणखी पुढें भोगायचे ते निराळेच !

चंद्रराव—तुझ्या तोंडचे हे शब्द ऐकायलाच का मला परमेश्वरानें जिवंत ठेवलें ?

दु०—पण मी असें बोललें तरी काय ?

चंद्र०—माझ्यामुळें तुला दुःख झालें ह्मणून.

दु०—मलतेंच कांहीं तरी ! या जगांत माझ्या सौख्याचें भांडार काय तें आपण ! आणि आपल्याला मी असें कसें ह्मणेन बरें? तसें जर खरोखरीच मी ह्मटलें असेन तर पदर पसरतें आपल्यापुढें.

चंद्र०—आतां असें ह्मणतेस आणि मघाशीं ह्मटलेंस कीं, लग्नामुळें क्लेश सोसायला लागले ह्मणून ?

दु०—शब्द चुकून गेले असतील. पण मनांतून काय ह्मणायचें होतें तें माझ्या ध्यानांत आहे. हें पहा—उपयोग नाहीं हो ! तसें झालेंच तें. ( कावरीबावरी होते. )

चंद्र०—तूं खरोखर भ्रमिष्टासारखें कांहीं तरी बडबडतेस. आनंदाच्या भरांत हें प्रथमतः माझ्या लक्ष्यांत आलें नव्हतें. परंतु आतां—

दु०—मी आपल्या पायां पडतें ! कुणाजवळ बोलूं नका.

चंद्र०—तुला आज कांहीं तरी झालें आहे.

दु०—होय, मला ठाऊक आहे काय झालें आहे तें पण मेलें औषध कुठें आहे.

चंद्र०—औषध कसलें ! थोडी झोंप घेतलीस ह्मणजे हुषार होशील. चल, मी तुझ्या मनांतलें दुःख दूर करतों.

दु०—अगोदर मूळ नाहींसें केल्याशिवाय दुःख कसें दूर होईल ?

चंद्र०—मांग तर दुःखाचें मूळ काय तें. म्हणजे दूर केलेंच म्हणून समज.

दु०—आपणच माझ्या दुःखाचें मूळ !

चंद्र०—( आश्चर्यानें ) काय मी ! मी तुझ्या दुःखाला कारण झालों ! तो कसा ?

दु०—आपण मला जाणून बुजून दुःख दिलें असें मी म्हणत नाहीं, पण आपल्यामुळें मला—

चंद्र०—हें असेंच तूं मला सौख्य देणार काय ? केवळ तुझ्या आशेवर इतकीं संकटें भोगलीं, इतके कष्ट सोसले, उपाशीं राहून दिवस काढले, फक्त तुझ्यासाठीं तुरुंगाची भिंत उडण्याचें साहस केलें, आणखी त्याची फेड तूं अशी करतेस काय ? इतकी तुझ्यावर जिवापलीकडे प्रीति करीत असून तूं मला आपल्या दुःखाचें मूळ म्हणतेस तेव्हां आतां काय म्हणावें !

दु०—उगीच कां मनाला त्रास करून घेतां ? लवकरच होईल याचा उलगडा. ( असें म्हणून जाऊं लागते. चंद्रराव तिला अडवून म्हणतो. )

चंद्र०—हें काय ! मला सोडून चाललीस कुठें ?

दु०—जाऊं द्या मला. दोघांचेंही हित आहे त्यांत. खरेंच हात जोडतें मी. सोडा मला.

चंद्र०—असें भलतें भलतें बोलून गोंधळांत पाडूं नकोस मला. मघाशीं म्हटलेंस तसें करायचें नाहींना तुझ्या मनांत ? ( आपल्याशीं ) नाहीं पण. इच्या मनात आज कांहीं तरी वेड शिरलें आहे खास. त्याशिवाय ही अशी भकायची नाहीं. ( तिला ) लाडके, जरा विचार कर. तो झटका गेला निघून. चल नीज आतां. नाहीं तर जाग्रणानें पित्त भडकेल. चल—

दु०—आतां कुठें चल! आपली आणि माझी संगत सरली.

चंद्र०—पण तुझी माझी संगत सोडविणार असा कोण !

दु०—माझें हें फुटकें नशीब ! दुसरें कोण ? आपल्याला ती भयंकर हकीकत कळायची आहे अजून. पण त्या नादीं आपण लागूं नये हें बरें. कारण, ( डोळ्यास पदर लावून ) आपल्या मुखांत माती पडल्यावर आपण आपल्या भोळसर—प्रेमळ मनाला दोष द्याल, मला अंतःकरणांतून हुमकून लावाल, माझी छी थू कराल ! हें मी आतांच सांगतें. कांहीं का असेना त्याचा मेला शेवट हा व्हायचाच. पण मी मेल्यावर माझे अपराध पोटांत सांठवून माझ्यावर दया करा, हें माझें या पायांपाशीं शेवटचें मागणें आहे. ( असें ह्मणून चंद्रराव 'हां हां' ह्मणत असतां ती झटकन त्याला न सांपडतां निघून गेली. )

चंद्रराव—( चकित होऊन ) याचा अर्थ काय ? काय तिनें मनांत आणलें आहे ईश्वराला ठाऊक. माझ्या मनांत तर चमत्कारिकच कल्पना येऊं लागल्या आहेत. छे ! मला खास वेड लागणार. यांत कांहीं तरी घोंटाळा आहे, आणि तो लवकरच बाहेर फुटणार. आतां नाहीं माझ्यानें धीर धरवत. मला तें सर्व कळलेंच पाहिजे. पण कळणार कसें ? तिच्याशिवाय दुसरा मार्ग नाहीं; आणि केव्हां तरी ती गोष्ट जर बाहेर फुटायचीच तर तिनें ती मला सांगितलीच पाहिजे. कारण, माझ्या नशीबाचा हवाला काय तो तिच्यावर. तीच तारो किंवा मारो. ( तिच्या शोधास जातो. )

( अंक चवथा समाप्त. )

# अंक ५.

## प्रवेश पहिला.

स्थळ—एक खोली.

पात्रें—चंद्रराव व कोंडाऊ.

चंद्रराव—( इकडून तिकडे फिरत ) बस्स. पाहिजे होतें तेवढें कळलें. 'जगावें कीं मरावें' हें पुष्कळांना एक मोठें गूढ असतें. पण मला तें अगदीं सोपें झालें आहे. हें पहा याचा निकाल कसा लावायचा हें ठरलें, आतां जास्त चवकशी करण्याची जरूरच उरली नाहीं. जा, मला एक कागद, दऊत आणि लेखणी इतकें आणून दे. कांहीं थोडें ल्याहायचें आहे तेवढें लिहितों, नंतर जाऊन झोंप येते का पहातों. ( कोंडाऊ जाते. ) काळझोंप आली तर सोनेंच झालें. ( दुर्गास उद्देशून ) अरेरे ! लाडके, तुझ्या दुःखाचें कारण आत्तां मला समजलें बरें ! तूं माझ्याशीं अभिष्टासारखें बोलत होतीस, तुझें मन थाऱ्यावर नव्हतें, याचें कांहीं मला आतां मोठेंसें आश्चर्य वाटत नाहीं. लाडके, तुझी किती हानि झाली या गोष्टीचा जर मी नुमता विचार करायला लागलों, तर मी देखील वेडा होईन यांत संशय नाहीं. काय बिनतोड प्रसंग हा ! देव कोपला, दैवानें उलट घेतली, ग्रहदशा फिरली, एकदमच सर्व कसें प्रतिकूल झालें पहा ! हां ! मी भकायला लागलों वाटतें. पुरे आतां. पण मी देवाला आणि दैवाला काय म्हणून नांवें ठेवतों ? प्रत्यक्ष माझा बाप आणखी माझा भाऊ हेच राहुकेतूसारखे हात धुवून माझ्या पाठीशीं लागले आहेत. मला खड्यांत घालतील तेव्हांच ते संतुष्ट होतील ! काय चमत्कार अ ! मी जिवंत आहे हें त्याला "माहीत होतें ; त-

सैत्र आमचें परस्परांवर किती प्रेम आहे हेंसुद्धां त्यांना ठाऊक होतें. इतकें असून तिनें आपलें सर्वस्व दुसऱ्याला वाहिलें, हें त्यांच्यानें पाहवलें तरी कसें? किती निर्दय बाप हा! कोण दुष्ट राक्षसी भाऊ हा! बरें. या अनर्थाबद्दल दोषाचें पाप तुमच्या पदरांत घालीन, आणि मग मी तुमच्या दृष्टि-आड व स्मृति-आड जाऊन पडेन. हें खास. ( इतक्यांत कोंडाऊ कागद, लेखणी वगैरे आणून देते. चंद्रराव एक लहानसें पत्र लिहितो. कोंडाऊ निघून जाते. ) मला गुंगी आल्यासारखें वाटतें हें काय? माझ्या लाडकीची प्रकृति आज ताळ्यावर नाहीं. मला तर झोंपेनें घेरलें. पण ही झोंप कीं काळ झोंप? काळझोंप आली तर सर्वच काळजी संपली. जाऊं तर खरे. ( जातो. )

## प्रवेश २ रा.

### दुसरी खोली—काळ्या व कोंडाऊ.

**कोंडाऊ**—काळ्या, हें काय लचांड झालें पाहिलेंस का? बाईसाहेबांचे पहिले नवरे चंद्रराव आले.

**काळ्या**—( हंसत ) चंदरराव आल! मंजी समंद होऊनशेनी आल का काय?

**कोंडाऊ**—समंद होऊन नाहीं, खरोखरीच आले.

**काळ्या**—अग चल. अशी का ठकबाजी लावलियास माज्या म्होर? म्येलेल मानुस परतुन कदीं आलया? मरून हैना दोन हैन झाल असल तर एकांद मानुस सपनांत मातुर कुनाला तरी दिसत. पन त्येसनी मरून सात वर्स झाली; आन् ह्मन चंदरराव आल मागारी?

**कोंडाऊ**—आतां काय सांगू तुला? खरेच आले.

**काळ्या**—मग आमचा बा न्है आला तर? त्यो मरून सम्दी वर्स चार झाली.

**कोंडाऊ**—अजून तुला खोटें वाटतें ? बाईसाहेबांच्या पायांशपथ चंद्रराव परत आले. झालें ?

**काळ्या**—( गोंधळून ) आं—बर, कवा आल ?

**कोंडाऊ**—रात्रींच. तूं गोसावडा म्हणून समजलास तेच चंद्रराव. उगीच त्यांना काइबाई बोललास.

**काळ्या**—मग मातुर त्या भामटयान तुमासनी खास फशिवल. तूं झालिस म्हातारी, तवा तुला लागलया थेड. अग बायकु मिळावी म्हुन् मीच चंदरराव अशी त्येन थाप मारली, आन् दुसर काय ? म्या असल पुष्कळ भोंदू बगितल्याती. ( रागावून ) इचिभन ! कुट है त्यो ? चल दावतो त्येला काळ्याचा हिसका. चल—

**कोंडाऊ**—मेल्या मोठ्यानें तरी बोलूं नकोस. बाईसाहेबांनीं सुद्धां ओळखलें. सगळ्या खुणा पटल्या. आणखी काय ह्मणतोस ?

**काळ्या**—बाईसायबानी वळकूल असल तर मग ह्मोर काय माज ह्मन्न न्हैं.

**कोंडाऊ**—तें झालें. पण बाईसाहेब तर पाट लावून चुकल्या, आतां पुढें वाट ?

**काळ्या**—ह्मोरली वाट हत कुना ब्येकाला दिसातिया म्हना, पन चंदरराव किती झाल तरी बी पयल्या लगनाच नवर, तवा जातभाई त्येच्या परमानच सांगनार, वाम्न बी त्येच म्हन्नार, आन् सरकारा पातोर ग्येल तरी बी तसच व्हनार.

**कोंडाऊ**—हो, मला सुद्धां असेंच वाटतें. पण चंद्रराव आतां पाट लावलेल्या बायकोला नांदायला कसे घेतील !

**काळ्या**—कां ? त्येला कंची हरकत है ? ह्मोतुर लागून अजून पुरं दोन रोज बी झाल न्हैत. आनू आपली बायकु घरांत घ्येयाला कोन नग म्हन्नार ?

**कोंडाऊ**—तूं मेल्या अगदीं अडाणी आहेस. गरिबा-गुरिबांत तसें उट्टेमाट्टें चालतें. पण त्यांना लोक हंसतील कीं तसें केलें तर !

**काळ्या**—हंसत्याल त्यांच दात दिसत्याल. पन बायकु तर गावल कीं न्हे ? आन् इक्त बी करायच नसल, तर असना म्होतुराचा नवरा. त्येच्याकड चार झैन नांदल, ह्येच्याकड चार झैन नांदल ! तत काय बिनास्तया ?

**कोंडाऊ**—मेल्या पुरे शहाणपण आतां ! तोंडाला जसें कांहीं हाडच नाहीं. मला म्हणतो ' असेनात दोन नवरे ! ' असें कुठें झालें आहे ?

**काळ्या**—आन् दुरपादिला पांच नवर व्हत म्हुन बाम्न सांगत्यात त्ये ? त्ये खोटं असल न्हे ? उगच स्वांग इचिभन !

**कोंडाऊ**—बरें बाबा, तूं म्हणतोस तें खरें. झालें ? पण अगोदर जिवाजीरावाकडे जा, आणि चंद्रराव आले आहेत असें सांगून त्यांना घेऊन ये, जा.

**काळ्या** —त्या म्हाताऱ्याकडे ? नगग बया ! तूंच जा व्हंव तर, मी तत ग्येलो तर माज टाळकच सडकिल त्यो ! लइ कडवा हे बग.

**कोंडाऊ**—तर मग कसें करायचें ? मला कांहीं इथून हालतां येत नाहीं. न जाणो, कांहीं बरें वाईट झालें तर दोष आमच्या कपाळीं येणार, म्हणून म्हणतें.

**काळ्या**—व्हय, ह्ये मातुर खर. बायलापायीं खून बी पडत्याती. तवा अदुगरच खबारदारी राकावी, यांत शेनपन है. ह्यो निगालुच बग तकड.

( दोघेंही जातात. कोंडाऊ बाईसाहेबाकडे जाते. )

# प्रवेश ३ रा.

स्थळ—निजण्याची खोली.

( **चंद्रराव** पलंगावर निजला असतां **दुर्गा** येते. )

दु०—अग बाई! किती लवकर झोंप लागली ही! खरोखरीच किनई, आपण मोठे, मोठे सुखी. कारण, आपल्याला अशी चटकन् झोंप तरी लागते. मी मात्र आतां या झोंपेला अंतरलें. बरें, झोंपेनें जर सुख होतें, तर मग ज्याला पुष्कळ झोंप लागते, तो फार सुखी समजायचा. आणखी मरणें ह्मणजे अखंड झोंप घेणें. तेव्हां जो ही अखंड झोंप घेतो त्याच्या सुखाला अंतच नाहीं ह्मणायचा. ( चंद्ररावास उद्देशून ) पण संभाळा बरें! आतां हा वणवा हां हां ह्मणतां पसरेल. ह्मणून मी आपल्याला सांगतें कीं, आपण पुनः जागेच होऊं नका. जितकी माझ्यावर आपली निर्मळ प्रीति असेल तितकी आपल्याला उद्यां पीडा होणार. ( कांहीं वेळ थांबून ) या मूर्तीकडे पाहूं लागलें कीं प्रत्यक्ष काळाचें देखील कांहीं चालेनासें होतें, आणि पुनः प्रेमाचा उमाळा फुटायला लागतो. पुरे आतां. शेवटचे एकदां डोळे भरून पाहून घेतें म्हणजे झालें. पण -कोण मी मेली निर्दय पहा! ही अगदीं अखेरची भेट, आणि नुसत्या एकदां पहाण्यानें मनाचें समाधान होईल तरी कसें? कडकडून मिठीच मारली पाहिजे. ( असें म्हणून चंद्ररावाच्या किंचित् जवळ जाते व चपापून म्हणते. ) अग बाई! कुणीकडे चाललें मी? धांवा हो आनंदराव, धांवा लवकर! मी आपली लाज गुंडाळून ठेवून भलतेंच करायला निघालें! असाल तिथून धांवा, आणखी आंवरून धरा मला. ( मध्येंच कांहीं ऐकलेसें करून ) ऐका हं. काय वाजलें तें? दार वाजवीत आहे कुणी. मला वाटतें आनंदराव आले. कुणी का—

चंद्रराव ( पलंगावर उठून बसून )—लाडके, ये.

दु०—मलाच कुणी लाडके म्हणून हांक मारीत आहे ?

चंद्रराव—किती वेळ अशी दूरदूर रहाणार तूं ?

दु०—( दचकून ) अग बाइ ! हा पुरुषाचा शब्द ! माझ्या पलंगावर तो पुरुष कसा आला ? दुसरें कांहीं नाहीं. मला या जगांत चोहींकडे कसाईपणा माजला आहे. अरे मांगा, 'किती वेळ दूर रहाणार का ! ' ही आलें ये जवळ. ( असें ह्मणून खंजीर उपसते, व म्हणते ) नवरे जर स्वर्गांत जातात तर त्यांना स्वर्गांत पाठविणारे कुठें जातात हें मला पहायचें आहे. ( हात उचलते. चंद्रराव घाबरून उठतो. त्यास ओळखतांच ती ओरडून म्हणते ) अरे देवा ! हे कोण ?

चंद्र०—लाडके, तुझ्या हातांत हा खंजीर ! आणि मला मारण्याकरतां !

दु०—( खजील होऊन व हात खालीं करून ) होय. आपल्यालाच मारण्याकरितां !

चंद्र०—छे ! असें कधींच व्हायचें नाहीं.

दु०—वेडाच्या भरांत मी हें नरकाच्या द्वारांत पाऊल टाकलें होतें, पण आपल्यास पाहून—( असें म्हणून दूर पळूं लागते. )

चंद्र०—( तिला धरण्याकरतां उठून ) लाडके ! मला पाहून तूं अशी कां बरें दूर दूर पळतेस ?

दु०—माझ्यानें आपल्याकडे पहावत नाहीं हो ! देवा ! अरे, मला एकदां भस्मिष्ट तरी करून टाक पुरी. ( असें म्हणून वेगानें पळून जाते. )

चंद्र०—( कोंडाऊ दुरून येत आहे असें पाहून ) कोंडाऊ, धांव लवकर ! ती पहा तिकडे गेली. धर तिला. ( कोंडाऊ जाते. ) अरेरे ! काय ही बिचारीची दशा झाली !

इच्यापासून मला सुख तर नाहींच, पण उलट यातना मात्र भोगाव्या लागतात. मला आतां पहावें तिकडे भयाण दिसायला लागलें, माझें मन खचलें, चहूंकडून निराशाच बळावत चालली! मी अगदीं मृत्यूच्या तोंडाशीं येऊन पोंचलों. थोडक्याच वेळानें तो मला 'आ' करून गिळून टाकणार, यात शंका नाहीं! असो. जोंपर्यंत माझीं हीं इंद्रियें माझ्या स्वाधीन आहेत तोंपर्यंत माझ्या लाडकीवर 'दया कर' म्हणून दयाघन परमेश्वराचा धांवा तरी करतों. (असें म्हणून हात जोडतो, व वर दृष्टि करून म्हणतो) देवा! तूं सर्वसाक्षी आहेस, तेव्हां तुला निराळें काय सांगायचें? पण माझ्या लाडकीला या हालांतून लवकर मुक्त कर, तसेंच, या तीव्र दुःखाच्या वेगामुळें अंतकाळा पूर्वींच जर माझ्या बुद्धीला भ्रम पडून माझ्या हातून कांहीं अपराध घडला तर त्याची क्षमा कर. (हें चाललें आहे, इतक्यांत कोंडाऊ येते.)

**कोंडाऊ**—महाराज बाहेर कोणसा आला आहे. त्याच्या मनांतून आपल्याशीं कांहीं बोलायचें आहे. नांव विचारलें तर कांहीं सांगत नाहीं.

**चंद्रराव**—पण, लाडकी कुठें आहे? तूं तिच्या मागून गेलीसना मघांशीं?

**कोंडाऊ**—होय. त्यांच्या मागून गेलें, पण त्या मला सांपडल्या नाहींत, म्हणून दोन तीन ठिकाणीं पाहिलें. शेवटीं त्या देवघरांत बसलेल्या मी पाहिल्या. देवापुढें डोकें टेंकून स्वस्थ बसल्या आहेत. दोन चार हांका मारल्या तरी ओ देईनात.

**चंद्र०**—बरें, तूं जा अगोदर तिच्यापाशीं जाऊन बैस. मी बाहेर कोण आला आहे त्याला भेटून तिकडेच येतों. जा. (जाते.) हे माझे दोस्त सोमाजीराव आले असतील.

या ठिकाणीं काय घोंटाळा उडाला आहे याची त्यांना कल्पना सुद्धां नसेल बरें ! असो, वेळेवरच आले म्हणायचे. त्यांच्या स्नेहाचा कांहीं तरी उपयोग करून घ्यावा आणि मग—( असें ह्मणून जातो. )

---

## प्रवेश ४ था.

स्थळ——रस्ता.

**तुळाजीराव** पुढें व **सटव्या** आणि दुसरे तीन मारेकरी मागें.

**तुळाजीराव**——( मारेकऱ्यांस अंतरावर पण जवळच असे हुषारीनें रहाण्यास सांगतो, आणि आपल्याशीं ह्मणतो. )

पुनः मी आपला धाकटा भाऊ तो धाकटा भाऊच ! कधींच याचा निकाल करून टाकायचा. पण मीच चुकलों, असलीं कामें कशीं तडाक्यासरशीं उडवून टाकलीं पाहिजेत. आज करूं, उद्यां करूं, असें ह्मटलें कीं चढलींच उरावर ह्मणून समजावें. खरेंच, धाकटा भाऊ ह्मणजे शुद्ध वेगारी असें समजलें पाहिजे. नांवाचा मात्र भाऊ, बाकी मान काय, मरातब काय, अधिकार काय, सर्व थोरल्या भावाला. धाकट्या भावाच्या वांट्याला काय ? तर याच्यावर देखरेख कर, त्याच्यावर देखरेख कर, अमक्याकडे जा, तमक्याकडे जा, आणि यांनीं खुशाल लोडाला टेंकून रहावें ! आपल्याला नाहीं बा खपत असला दुय्यमपणा. होईल तर एकटा मालक होईन. ही आतां आमच्या दादासाहेबांची स्वारी आली आहे ही स्वस्थ बसेल ह्मणतां ? पुढें पुढें करून—लाळ घोंटून त्या थेरड्याची मर्जी पुनः संपादन करून घेतील. कीं वाजले मग आमचे बारा ! शिवाय

तो जर जिवंत राहील तर दुसरीच एक भीति आहे. ती ही कीं, आह्मीं केलेल्या सोदेगिऱ्या तो बाहेर पाडणार, आमचें तोंड बंद होणार, आणि सर्वच लाट त्याच्या हातीं लागणार ! छे ! तें कांहीं नव्हे. त्याला या जगांतून लंबा केलाच पाहिजे. आणि तो सुद्धां आजच्या आज. कारण, त्या पहिल्या वारावर कांहीं भरंवसा ठेवतां येत नाहीं. तेव्हां 'शुभंच शीघ्रं.' आपली तयारी कडेकोट आहे. त्याविषयीं कांहीं भीति नको. आला की उडविलाच. अरे, हा आलाच वाटतें—(आपल्या लोकांस इषारा करतो. इतक्यांत चंद्रराव येतो. व ते चवघे मारेकरी त्याच्या अंगावर धांवतात. चंद्ररावाची व त्यांची झटापट चालते. इतक्यांत आनंदराव आपल्या भावास घेऊन येऊन पोंचतो. त्याच्या ही मारामारी दृष्टीस पडतांच तो आपले लोक घेऊन धांवतो. मारेकरी पळून जाऊं लागतात, परंतु त्यांपैकीं एक आनंदरावाच्या हातीं लागतो. बऱ्याच जखमा लागल्यामुळें ज्याचें सर्वांग रक्तानें भरलें आहे असा चंद्रराव आनंदरावास ओळखून ह्मणतो.)

**चंद्रराव**—जरी माझा जीव मला जड झाला होता तरी आपण तो वांचविलात याबद्दल आपला मी ऋणी आहें. परंतु त्यांच्या हातून मेलों असतों तर फार चांगलें झालें असतें. असो, अजून थोडें भोक्तृत्व आहे ह्मणायचें.

**आनंदराव**—( आपल्या चाकर लोकांस ) हं त्यांना नीट संभाळून घेऊन चला. ( सर्व निघून जातात. )

# प्रवेश ५ वा.

स्थळ—देवघर.

दु०—देवा ! घडघडीत नवऱ्याचा प्राण घ्यायला धांवलेंना ! कोण तरी मेली राक्षसीण मी ! आतां कांहीं म्हणून प्राण ठेवायची सोय उरली नाहीं. छे ! मनांत सुद्धां नको आणायला. न जाणो, पुनः भ्रमाच्या लहरींत कांहीं तरी भलतेंच करून बसेन. एकदां मन दगडासारखें केलें पाहिजे खरें. मग कां ? ( असें ह्मणून लपविलेला खंजीर हातांत घेऊन त्यास उद्देशून ह्मणते ) बाबा ! पाहिजे तिथें घुसून माझ्या या शरीरांत प्राण घेण्याची शक्ति तुझ्या अंगीं आहे ; पण तसें करूं नकोस हो. ही पहा, माझ्या उरांत तुला पाहिजे तितकी जागा आहे. काय पराक्रम दाखवायचा असेल तो इथें दाखीव. ( असें ह्मणून उरांत खजीर खुपसणार तों आनंदराव येतो, व तिच्या हातांतून खंजीर काढून घेत घेत ह्मणतो. )

आनंदराव—हां हां हां ! काय करतेस हें ? विनाकारण त्या बिचाऱ्या प्राणावर कां उदार झालीस ? असा त्यानें तुझा अपराध तरी काय केला आहे ?

दु०—( आवेशानें ) माझ्या हातून कांहीं अपराध घडला नाहीं अशी शपथ वहा, तर तुमचें ह्मणणें मी खरें मानीन. पण माझ्याशीं तुम्हांला काय करायचें आहे ? कृपा करून सोडा मला. ( जरा मागें सरून व हा आनंदराव असें ओळखून त्यास ह्मणते ) आपण का हे ! तुमच्याच पायांत इतका अनर्थ बरें ! मी तुमच्याशीं लग्न लावलें हें माझ्या मनांत भरवून द्यायचा आपला बेत होता. पण मी कांहीं अगदीं बोळ्यानें नाहीं दूध पीत. समजलांत ?

आनंद०—तूं मला आधीं ओळखलेंस का पण ? मी तुझा प्रियकर पती आनंदराव.

दु०—मला आतां पती नाहीं, कोणी नाहीं. माझे पती होते ते बाळापुरच्या लढाईंत पडले. कां ? पडले कीं नाहीं ?

आनंद०—हो, पडले खरे.

दु०—पण शपथ घ्या पडले ह्मणून. हं घ्या लवकर, किती उशीर ! ( रक्तानें भरलेला चंद्रराव तलवारीवर भार ठेवून हळूं हळूं येतो. त्याकडे पाहून ) हे रक्तानें माखलेले गृहस्थ माझ्यापुढें येऊन उभे रहायच्या पूर्वीं घ्या शपथ, कीं ते लढाईंत पडले ह्मणून. ( चंद्ररावाला ओळखून मूर्छा येऊन पडते. )

आनंद०—( तिला सांवरण्याकरितां पुढें सरून ) अहो धांवा लवकर ! पडली-पडली ! ( चंद्ररावास ओळखून ) काय ! चंद्रराव जिवंत !

चंद्र०—मेलोंच होतों. पण प्रारब्ध खोटें ह्मणून हे सोहाळे भोगायला जिवंत राहिलों.

आनंद०—चंद्रराव किंवा आनंदराव या दोघांपैकीं एक मेला पाहिजे हें ठरलेंच आतां.

चंद्र०—( एकीकडे ) तुह्मीं मारेकऱ्यांच्या हातून माझा प्राण वांचविला तो वांचवायचा नव्हता. कारण, मी प्राणाला अगदीं कंटाळून गेलों होतों. त्यांतून तुह्मीं वांचविलात हें तर फारच वाईट झालें. लाडके, तुझ्यापुढें माझा अंत व्हावा ह्मणून मी इथें आलों. हे तुझे आनंदराव जर माझ्या दृष्टीस पडले नसते, तर मी सुखानें मेलों असतों; पण मरतांनाही मला दुःखच व्हायचं ! असो, नशीब माझें ! बरें शेवटीं तरी एकदां आलिंगन——

आनंद०—हां ! पुनः ती गोष्ट मात्र नाहीं.

चंद्र०—( कपाळावर हात मारून ) नशीब ! ( एकीकडे ) आतां या दुःखांत कुचंबत पडण्यापेक्षां दैवालाच सहा-

य करून एकदां मोकळें व्हावें हें ठीक. ( असें ह्मणून हळूच कमरेचा जंबिया काढतो व पोटांत खुपसण्यापूर्वी ह्मणतो ) बरें, आनंदराव हें एवढें पत्र कृपा करून आमच्या बाबांच्या हातीं द्या. ( पत्र देतो. ) आणि माझा कांहीं आतां नेम नाहीं. ह्मणून मुलाचें आपल्या मुलाप्रमाणें संरक्षण करा. ( जंबिया सरसावीत सरसावीत ) परमेश्वरा, कर आतां मोकळा या दुःखां—( जंबिया उरांत खुपसून घेतो व मरतो. )

आनंद०—( घाबऱ्या घाबऱ्या ) अरे अरे! धांवा कुणी तरी. काय कोणीच येत नाहीं? ही ही बेशुद्धच पडली आहे; अरे कोण आहेरे? ( असें म्हणून बाहेर जातो. )

दु०—( शुद्धीवर येऊन ) अग बाई! कुठे पडलें आहें मी? हं समजलें. मी अगदीं मरणाच्या दारांत येऊन उभी राहिलें आहें. केव्हांच आंत जायची, पण मेला जीव मागें गुंतला ह्मणून नाइलाज झाला. ( हुंदका काढून ) जिवंत राहून सोय नाहीं, आणि प्राण तर कांहीं जात नाहीं, असा मेला दोन्हीकडून वणवा पेटल्यावर करावें तरी काय? ( इतक्यांत चंद्ररावाच्या शवावर दृष्टि जाऊन मोठ्यानें हंबरडा फोडीत ) अरे चांडाळा प्रालब्धा! घात केलास रे मेल्या! माझा प्राण काढून नेलास! माझें सर्वस्व लुटलेंस! आतां काय करूं? अहो इथें कुणी आहे का हो! आतां लवकर या प्रेताचें, आणि ( आपल्या उरावर हात ठेवून ) या प्रेताचें एकदमच दहन करून टाका. उचला हो लवकर कुणी तरी. ( आनंदराव चाकरासह येतो. ) अरे ही या प्रेतावर अंग टाकून पडली आहे. हिला अगोदर बाजूला काढली पाहिजे. ( तो व चाकर तिला उचलूं लागतात )

दु०—( संतापानें ) खबरदार. मेल्यांनो, माझ्या अंगाला हात लावाल तर! माझा प्राण गेला तरी मी यांना सोडायची

नाहीं आतां. (प्रेतास जोरानें मिठी मारून) अरे देवा! हा जंबिया उरांतच आहे अजून! कोण्या चांडाळाचा हात जळला हा? (आनंदरावास) तुह्मींच हो तुह्मींच ही कसाबची करणी केलीत. माझ्या लोभानें तुह्मींच यांचा खून केलात.—

आनंद०—न्या तुह्मीं तिला आंत उचलून—हळूंच—

दु०—अरे नका रे मला ओढूं. (हलकेंच चंद्ररावाच्या उरांतील जंबिया काढून घेऊन लपवून ठेवते.) नकोरे. तुमच्या पायां पडतें. मी तुमची धर्माची मुलगी रे! (ते जोरानें ओढतात.) अरे मेल्यांनो! माझे हात तरी तोडून टाका, म्हणजे या प्रेताबरोबर जळतील. आतां काय करूं रे देवा! हे कसाब नाहीं ऐकत माझें! या प्रेताचे ते आतां हालहाल करतील ग बाई! अरे मांगानो! याचा तुह्मांला यमाच्या घरीं झाडा द्यावा लागेल बरें! (तिला नेतात.)

आनंद०—बरें, आतां पुढें तजवीज? (इतक्यांत जिवाजीराव, तुळाजीराव, सोमाजीराव, काळ्या व आणखी कांहीं चाकर इतके येतात.)

जिवाजी०—(डोळे पुसून शिव! शिव! वृद्धापकाळीं माझ्यावर काय प्रसंग आला हा! कुठें आहे हो त्याचें प्रेत? माझ्या दृष्टीस पाडा लवकर!

तुळाजी०—हे माझे दादासाहेब इथें पडले आहेत! (बापलेक त्या प्रेताजवळ बसतात.)

आनंद०—यांचें प्राणावसान होऊन बराच वेळ झाला. आज एकादशीचें मरण आलें, तेव्हां खरोखर ते वैकुंठाला गेले! फारच सज्जन!

तुळाजी०—माझ्या दादासाहेबांना वैकुंठ मिळणार यांत शंकाच नाहीं. पण तुह्मीं हें जें घोर कर्म केलें त्याबद्दल तुह्मांला मात्र नरकाशिवाय दुसरें ठिकाण नाहीं.

**आनंद०**—( साश्चर्य ) तुह्मीं असें बोलतां याचें मला फारसें आश्चर्य वाटत नाहीं. कारण, प्रत्यक्ष तुमचे वडील बंधूच एकाएकीं वारले, तेव्हां तुह्मांला दुःख होणें हें स्वाभाविकच आहे.

**तुळाजी०**—मग तुमचें ह्मणणें काय ?

**आनंद०**—म्हणणें एवढेंच कीं, हें कृत्य मी केलें असें मात्र ह्मणूं नका.

**तुळाजी०**—कां बरें ह्मणूं नका ? तर तुमच्याशिवाय दुसरा कोण करणार ? तुह्मा आतां कबूल करणार नाहीं हें आह्मांला ठाऊक आहे. पण मी पुनः खात्रीनें ह्मणतों कीं हें कृत्य तुमच्यावांचून झालेंच नाहीं. तुह्मींच आमच्या दादासाहेबांचा खून केलात. जाऊं द्या, सरकार तरी कांहीं अंधळें नाहीं. या खुनाची नीट चवकशी होऊन अपराध्याला योग्य दंड होईपर्यंत नुसत्या बोलण्यांत काय अर्थ आहे ?

**सोमाजीराव**—( तुळाजीस ) रावसाहेब, मला वाटतें अगोदर हें प्रेत बाजूस उचलून ठेवावें. ( ठेवतात. )

**जिवाजी०**—( आनंदरावास ) तुह्मीं माझ्या मुलाचा खून करण्यासारखा त्यानें तुमचा इतका घोर अपराध तरी कोणता केला होता हो ?

**आनंद**—मी त्यांचा खून केला नसून तुह्मीं असें विचारतां तिथें इलाज नाहीं. मी तर उलटा त्यांचा प्राण वांचविण्याकरितां धांवून आलों. खोटें असेल तर माझ्या नोकरांना विचारा.

**सोमाजी०**—खरेंच हांक मारा त्यांना. ते काय सांगतात तें तरी ऐकूं.

**तुळाजी०**—ते काय सांगणार हो ! सांगून सवरून त्यांचे नोकर ते. शिवाय या कृत्यांत त्यांचेंही अंग असलेंच

पाहिजे. तेव्हां तुह्मीच आतां असें पहा कीं ज्यांनीं आपल्या धन्यासाठीं दादासाहेबांचा खून केला, ते खोटें बोलायला मागेंपुढें पहातील का? छे! त्यांना विचारण्यांत कांहीं अर्थ नाहीं. ( आनंदरावास ) तूं यांचा प्राण वांचविण्यासाठीं धांवून आलास काय ! तर मग त्यांचे शत्रू कोण रे? कुणाचें त्यांनीं नुकसान केलें होतें? कुणाचें घर बुडविलें होतें? विनाकारण कोण त्यांच्याशीं दुस्मानपणा करणार? तुझ्याशिवाय दुसरा कोण त्यांच्या वांकड्यावर असणार रे? आणखी ह्मणतोस मीं त्यांचा प्राण वांचविला ! अरे चोरा ! मला चांगला संभावित गृहस्थ दिसत होतास कीं ! तें कांहीं नाहीं. दादासाहेबांचें येणें तुझ्या पथ्यावर पडलें नाहीं. तुला वाटलें कीं, आपल्या सुखांत आतां व्यत्यय येणार, ह्मणून तूं आणि त्या अवदसेनें मिळून त्यांना वाट-आड करण्याची ही युक्ति काढलीत. दुसरा कसला संभवच नाहीं.

**सोमाजी०**—असें असेल तर—

**तुळाजी०**—अहो असेल तर कां? असलेंच पाहिजे.

**जिवाजी०**—तें कांहीं नाहीं. याची नीट चवकशी झाली पाहिजे. चला कुणी तरी जाऊन कोतवालास घेऊन या.

**तुळाजी०**—दुसरा कशाला? मीच जाऊन घेऊन येतों. ( असें ह्मणून जातो. )

**आनंद०**—हा तुह्मीं माझ्यावर गहजबच उडविलात ह्मणायचा ! असो, खऱ्याचा पक्षपाती परमेश्वर आहे. ( आपल्या नोकरांस ) अरे, त्या मघाशीं पकडलेल्या इसमाला घेऊन या. ( नोकर जाऊन सटव्यास घेऊन येतात )

**आनंद०**—( त्याच्याकडे बोट दाखवून ) चंद्ररावाच्या अंगावर तुटून पडलेल्या मारेकऱ्यांपैकीं हा एक आहे. आह्मीं चंद्ररावास सोडविलें त्या वेळीं आमच्या हातीं लागला. तेव्हांपासून घरांत एकसारखा गोंधळच चालला असल्या-

मुळें त्याची चवकशी करायला मला झालेंच नाहीं. आतां आपल्या समक्षच त्याला विचारतों ह्मणजे झालें. कायरे, बोल. या संबंधानें तुला काय माहीत आहे तें सर्व सांग.

सटव्या—( घाबरून ) सम्द-सम्द सांगतो मायबाप, पन घरीं चार पोरसोर हैती त्येंच्याकड बगुनशेनी माझा परान वाचवा.

आनंद०—तूं आणि तुझे साथी मिळून चंद्ररावाला ठार मारायचा बेत केला होता कीं नाहीं ? बोल.

सटव्या—व्हय. क्येला व्हता मायबाप.

जिवाजी०—( त्याच्या अंगावर धांवून ) कांरे ! कांरे ? त्यानें तुझें काय केलें होतें ? बोल.

सटव्या—( घाबरून ) काय बी न्हवृत म्हाराज !

आनंद०—( जिवाजीरावास थांबवून ) तर मग दुसऱ्याच्या सांगण्यावरून तुह्मीं हें कृत्य करणार होतां कीं काय ?

सटव्या—व्हय म्हाराज ! या पोटापाईं करनार व्हतो.

आनंद०—बरें माझ्या संबंधानें तुला काय माहित आहे ?

सटव्या—काइ न्है म्हाराज ! आमी त्येंच्या अंगावर हात टाकला, इक्त्या मंदी आपुन येऊनशेनी त्येचा परान राकला, आन् मला पकडून व्येवला.

आनंद०—( सर्वांस ) ऐकलेंत ? तुह्मीं कांहीं विचारा हवें तर.

सोमाजी०—कायरे, हें कृत्य करायला तुह्मांला कोणीं सांगितलें ? ( तो घुटमळतो. )

जिवाजी०—बोल कुणी सांगितलें तें, कां उडवूं कोरडे ?

सटव्या—मला गरिबाला कशाला व्होवती कोरड ! सम्द सांगतो म्हाराज.

**जिवाजी०**—बोल तर. कुणी सांगितलें ?

**सटव्या**—( भीत भीत ) आपल्याच तुळाजीरावांनीं सांगितल म्हाराज.

**जिवाजी०**—( सक्रोधाश्चर्ययुक्त ) काय काय ! कुणी सांगितलें ?- माझ्या कारभार्‍यानें ? छे ! असें कधीं व्हायचें नाहीं. खोटें बोलतोस तूं.

**सटव्या**—आतां आपल्या म्होर कशापाईं खोट बोलूं ? आज मनच मला खातया; हे पोट बगा लई चंगाळ है.

**जिवाजी०**—त्यानें काय सांगितलें तुला ?

**सटव्या**—त्ये म्हनल तुमी चंदररावाला ठार करा. मंजी दर असामीला येकेक मुंडास आन् पचीस पचीस रुपई मिळत्याल; आमी सरकारा मागीतला तवा त्येन ह्ये धा रुपई काढून माज्या हातावर ठेवल. ( असें म्हणून धोतराच्या पदरांत रुपये बांधले होते ते दाखवितो. )

**जिवाजी०**—( संतापानें ) अरे बेरडा ! तुळ्या !

**सोमाजी०**—काय ? त्यांनीं प्रत्यक्ष आपल्या वडील भावाचा खून करायला तुम्हांला सांगितलें.

**सटव्या**—व्हय म्हाराज. आन् आमी त्येच्या अंगावर धाऊन ग्येलो तवा त्ये ततच व्हत.

**जिवाजी०**—हें-हें जर सर्व खरें असेल तर देवा ! मला तूं चांगलें शासन केलेंस. चंद्ररावा ! माझ्या पायीं तुझी ही अशी दशा झाली बरें !

**सोमाजी०**—बरें, या चोराचें काय करायचें आतां ?

**जिवाजी०**—चला घेऊन त्याला. त्याला माहीत होतें तितकें त्यानें सांगितलें. ( सटव्याला बाहेर नेतात. )

**आनंद०**—खरेंच, या धांदलींत मी विसरलोंच. जिवाजीराव, चंद्ररावांनीं अगदीं अंतकाळीं हें पत्र आपल्याला देण्यासाठीं माझ्यापाशीं दिलें होतें तें घ्या हें. ( पत्र देतो. )

जिवाजी०—अहो, तुह्मी चंद्ररावाचे मित्र तेव्हां त्याचें अक्षर तुमच्या ओळखीचें असेलच ?

सोमाजी०—हो. चांगलें ओळखीचें आहे.

जिवाजी०—तर मग वाचा पाहूं. माझे डोळे पाण्यानें भरल्यामुळें मला कांहीं दिसत नाहीं.

सोमाजी०—बरें वाचतों. (पत्र उघडून वाचूं लागतो.) 'चंद्रराव याचा दंडवत साष्टांगनमस्कार. विनति विशेष. आपल्या द्वारीं येऊन माझा प्राणांत व्हावा असें झालें. मी लवकरच हें जग सोडून जाणार. परंतु बाळापुराहून मी तुळाजीरावास बरींच पत्रें पाठवून कुशळ कळविलें असतां आपण माझ्या स्त्रीस आनंदरावाशीं लग्न करूं दिलें, हें फार अनुचित केलें. असो. ईश्वर पहातच आहे.'

आनंद०—काय ? ते जिवंत असल्याबद्दल तुह्मांस ठाऊक होतें ?

जिवाजी०—छे हो ! एक अक्षर सुद्धां नाहीं ! (इतक्यांत कोतवाल व तुळाजीराव शिपायासह येतात.) तुळाजीराव आलास ? हें पत्र पहा. चंद्रराव आपल्या मरणाचें अपेश तुझ्या आणि माझ्या माथ्यावर ठेवतो. तेव्हां तुझें कांहीं त्यांत अंग होतें का ?

तुळाजी०—(अत्याश्चर्य दाखवून) आं ! कुणाचें ? माझें ? माझें अंग ? दादासाहेबांना मारण्यांत ? शिव शिव ! !

जिवाजी०—तो त्यांत लिहितो कीं, मी बाळापुराहून बरींच पत्रें पाठविलीं; आणि मला तर त्यांतलें एक देखील पोंचलें नाहीं. हें कसें ? बरें पण तो जिवंत होता हें तुला ठाऊक होतें काय ?

तुळाजी०—दादासाहेब जिवंत ! ईश्वराला ठाऊक असेल, मला कांहीं नव्हतें !

जिवाजी०—बरें सांग, त्याचें पत्र किंवा निरोप तुला कधीं आला होता का ?

तुळाजी०—छे छे छे ! शपथेला सुद्धां नाहीं.

सोमाजी०—हें तर मग मोठें आश्चर्य आहे. ( जिवाजीरावास ) कारण, ते आणि मी बाळापुरांत एकेच ठिकाणीं होतों तुझांला त्यांनीं पुष्कळ वेळ पत्रें लिहिलेलीं मीं पाहिलीं आहेत. त्यांत आपले हाल चालले आहेत अशाविषयीं ते नेहमीं मजकूर लिहित असत. शिवाय त्या पत्रांचीं आलेलीं उत्तरेंही मला दाखवीत असत. आणि तीं तुळाजीरावाकडून आलीं ह्मणून मला सांगत. तुह्मीच त्यांचे बंधु तुळाजीराव ना ?

तुळाजी०—मी त्यांचा भाऊ खरा. पण मीं कधीं त्यांना उत्तर धाडलें नाहीं.

सोमाजी०—बरें, उत्तरें धाडलीं नाहींत. पण त्यांचीं पत्रें तर येत होतीं ?

तुळाजी०—वः! असें मला शब्दांत पकडतां वाटतें ?

सोमाजी०—शब्दांत नाहीं पकडीत बरें ! तीं पत्रें अद्यापि त्यांच्याजवळ सांपडतील—( आटवलेंसें करून खिशांतून पत्रें काढतो. )

जिवाजी०—पण त्यांतला साधारण मतलब सांगा पाहूं.

सोमाजी०—किरकोळ गोष्टी कांहीं सगळ्या ध्यानांत नाहींत. पण ठोकळ मजकूर ह्मणजे इतकाच कीं, तुमच्या मनांतून त्यांची मुळींच दाद घ्यायची नव्हती. ते मेले तरी बेहेत्तर !

जिवाजी०—अरे अरे ! असें ऐकणें आज माझ्या कपाळीं आलेंना ? अरे नीचा तुळाजी ! तो तुझा सख्खा भाऊ कीं !

तुळाजी०—आपल्या पायांशपथ हें माझ्यावर नुसतें कु-

भांड रचलें आहे. तो कैदेंत होता, कीं त्याचे हाल होत होते कीं तो जिवंत होता, यांतलें मला एक अक्षर सुद्धां माहीत नव्हतें. काय तें आतां मीं त्याचें प्रेत पाहिलें एवढेंच !

**जिवाजी०**—समजलों. अरे, त्या मारेकऱ्याला आणा पुढें. ( लोक सटव्याला पुढें आणतात. )

**तुळाजी०**—( त्याला पहातांच दचकून मनाशीं ) अरे हा सटव्या ! आतां मात्र सांपडलों खास. बाबासाहेब ! आपणही माझ्या उलट जातां? हें त्या आनंदरावाचें व या सोमाजीचें—

**कोतवाल**—कां त्याला पहाण्याबरोबर दचकलां ?

**तुळाजी०**—दचकतों कां ? कायरे सटव्या—

**सोमाजी०**—रावसाहेब, याचें नांव आपल्याला कसें कळलें ? त्याला कशाला विचारतां ? त्यानें सर्व आधींच कबूल केलें आहे. ( इतक्यांत पाहिजे होतें तें पत्र सांपडतें. ) हें पहा, हें पहा तुमचें पत्र ! नाहीं ह्मणत होतां, पण सांपडलें. माझ्याच खिशांत होतें.

**जिवाजी०**—आणि हें यानेंच पाठविलेंना ? काय काय आहे त्यांत ? वाचा पाहू.

**सोमाजी०**—मी आतां सांगितला तोच मजकूर. यांच्या हातचें पत्र सांपडलें, आतां हरकत नाहीं बोलायला. कां तुळाजीराव तुह्मींच लिहिलेंत का हें पत्र ?

**तुळाजी०**—( कावऱ्याबावऱ्या मुद्रेनें इकडे तिकडे पहात मान हालवितो. )

**जिवाजी०**—तुळ्या ! अरे, हें मानाचें कसब कुठें शिकलास ? यापेक्षां माझाच कां नाहीं गळा कापलास आधीं, ह्मणजे हा प्रसंग पहायला तरी वांचलों नसतां. असा कां भामट्यासारखा पहातोस ? लहानपणीच तुझीं चिन्हें दिसत होतीं. पण सापाच्या पोराला वाढविल्यासारखा तुला वाढवून हा अनर्थ माझ्या मुर्खपणानें मीच ओढवून आणला.

**तुळाजी०**—बोला, काय पाहिजे तें बोला. सांपडलों खरा तुमच्या तावडींत. खोटीं पत्रें आणा, लटकाच साक्षीदार पुढें करा, त्याच्याकडून तुह्मांला हवें तें बोलवा—

**जिवाजी०**—अरे मांगा ! तुझ्या बापाला हे शद्ब ! हा तुझा काका–सटव्या तुझ्यापुढें उभा आहे पहा ! ज्याला तूं इसारा ह्मणून दहा रुपये दिलेस तोच हा. ( कोतवाल आपल्या शिपायांस हुषार रहाण्याविषयीं इषारत करतो. )

**तुळाजी०**—( मनाशीं ) कबूल झालों तरी प्राण वांचत नाहीं आतां, आणि नाकबूल झालों तरी वांचत नाहीं. मग डर तरी कशाला ! केलें तें बेधडक सांगून टाकावें. सध्यां मला इतकेंच वाईट वाटतें कीं, मारेकरी घालण्याच्या कामांत किंचित् अविचार झाला. त्यानें मीही ठार झालों, आणि माझे सर्व बेतही फसले.

**जिवाजी०**—( रागानें ) कांरे बेरडा ! तोंड कां बंद झालें ? तूं आपल्या सख्ख्या भावावर मारेकरी घातलेस कीं नाहीं बोल.

**तुळाजी०**—हो घातले. हा सटव्या त्यांपैकींच एक आहे.

**कोतवाल**—( शिपायांस ) पकडारे तर याला. आतां याला शिक्षा ह्मणजे हत्तीच्या पायांशी बांधायचें, किंवा तोफेच्या तोंडीं द्यायचें.

**जिवाजी०**—( संतापानें ) आणि कडकडीत तेलांत तळून कां काढाना या मांगाला ! पण चांडाळा, हें घोर कृत्य तूं कोणत्या उद्देशानें केलेंस ?

**तुळाजी**—दुसरा कोणता ? जगांतल्या पुष्कळ लोकांचा असतो तोच माझा. ह्मणजे द्रव्य; आणि तेंच माझ्या नाशाला कारण झालें. तुह्मी त्याच्यावरच पूर्वीं फार लोभ करीत होतां, ह्मणून मला वाटलें कीं तो जर जिवंत राहील तर पुनः तुमची माझ्यावरची मर्जी उडेल, आणि मरंपर्यंत

मला तुमच्यापासून एक फुटकी कवडी सुद्धां मिळायची नाहीं. उलट द्याल तें अन्नवस्त्र घेऊन आणि सांगाल तें काम करून रहावें लागेल. तें मला प्रशस्त वाटेना म्हणून मी अशी तोड काढली. तुह्मीच जर आम्हां दोघांना पहिल्यापासून सारख्या ममतेनें वागविलें असतें तर हा आजचा प्रसंग आला नसता. माझें कांहीं जरी झालें तरी या अनर्थाचें खरें मूळ आपण.

**जिवाजी०**—( डोळे पुशीत ) खरें बाबा ! म्हातारपणीं माझ्या नशिबीं पुत्रशोक लिहिला होता म्हणून मला तशी बुद्धि झाली. कुटुंबांतल्या माणसांत किंवा पोटच्या पुत्रांत आवड नावड केली ह्मणजे असा कांहीं तरी भयंकर परिणाम होतो. देवा ! मला वेळींच कां बरें नाहीं शिकविलेंस ? असो. तुझी इच्छा !

**आनंद०**—बरें तुळाजीराव, चंद्रराव जिवंत आहेत असें तुह्मांला माहीत असून त्यांच्या स्त्रीबरोबर लग्न करण्याची मला कां बरें भर घातलीत ?

**तुळाजी०**—बस्स, तशींच कांहीं कारणें होतीं ह्मणून.

**आनंद०**—ह्मणजे मला सांगत होतां तीच ना कारणें ?

**तुळाजी०**—तीं नव्हेत. तीं फक्त तुह्मांला सांगण्यापुरतींच ! खरें कारण ह्मणजे असें कीं, चंद्ररावाची आपल्या बायकोवर अतोनात प्रीति होती हें मला ठाऊक होतें. तेव्हां कदाचित् तो जरी कैदेंतून सुटून घरीं परत आला तरी बायकोची अशी व्यवस्था झालेली पाहून तो फार दिवस जगायचा नाहीं असा माझा तर्क होता.

**कोतवाल**—असा जर तुझा तर्क होता मग तूं त्याला ठार कां मारविलेंस ?

**तुळाजी०**—तुमच्या तर्कावर भरंवसा ठेवणें बरें वाटलें नाहीं म्हणून.

जिवाजी०—बरें. माझ्या नातवाबद्दल लोकांत कुजबुज आहे म्हणून सांगते होतास तें कशासाठीं ?

तुळाजी०—तुम्हीं त्याला संपत्तीचा चवथा हिस्सा देणार होता म्हणून बरें. आतां झाले तुमचे प्रश्न ? मला उत्तरें द्यायचा कंटाळा आला. तेव्हां मला आतां कुठें घेऊन जाणार तिकडे घेऊन चला म्हणजे झालें.

जिवाजी०—भोग चांडाळा तुझ्या कर्माचीं फळें. हे कोतवाल आहेत आणि तू आहेस. हिरा गेला. आतां खापरी कशाला पाहिजे ? ( हें एकतांच कोतवाल त्यास घेऊन जातो. )

जिवाजी०—देवा ! आतां हा पुत्रशोक मला कसा सहन होईल ! या पूर्वींच माझे डोळे मिटले असते तर चांगलें झालें असतें. ( कोणी येत आहेसें पाहून ) अरे रे रे ! ही माझी सून येत आहे वाटतें ! देवा ! काय ही हिची दशा केलीस ? ही तर अगदींच भ्रमिष्ट झालीशी दिसते. झालें. खचली माझी कंबर. ( इतक्यांत भ्रमिष्ट झालेली दुर्गा येते. मागून मुलगा रडतरडत येतो. )

आनंद०—( तिला पाहून ) अरे ! ही कशी आली इथें?

दुर्गा—( भ्रमांत ) काहीं नको बरें ! हा मेला सगळा कसायांचा बाजार आहे. मी कुणाचेंच काहीं ऐकत नाहीं. अहो पण कोतवाल कचेरी कुणीकडे आहे ? मला एक फिर्याद करायची आहे. तुमच्याकडे करूं का ? हालवा मान ! नको तर राहिलें. तुम्हीं कसे हे माझे हाल मांडले आहेत, याबद्दल मी देवाजवळच फिर्याद करतें. देवा ! बघेरे हे मला कसे छळतात ते. ( असें म्हणून पुढें येऊं लागते. )

जिवाजी०—( रडत ) हिच्या तोंडाकडे मुद्धां मला पहावत नाहीं ! देवा ! आतां माझे हे डोळे मिटीव.

दु०—( चंद्ररावाचें प्रेत नाहींसें पाहून ) अरे प्रालब्धा ! तुम्ही कुठे नेलेंत त्यांना ? आत्तां इतक्यांत इथें होते, मी प्रत्यक्ष पाहिले होते. ( रडूं लागते. ) कुठें हो तुम्हांला नेऊन माझ्या दृष्टि-आड दडवून ठेवलें ! ( लोकांस ) दाखवा हो. मला त्यांना कांहीं विचारायचें आहे. एकदां तरी डोळे भरून पहातें हो ! नाहींना भेटवीत ? बरें तर. ( मुलाला उचलून घेऊन ) हा माझा लाल ग बाई ! आतां कसें होणार ? ( चुंबन घेऊन ) या माझ्या सोन्यावर दयेचें पांघरूण कोण घालणार आतां ? जगांतला तर न्याय मेला बुडालाच सगळा. पण देवा तुझ्या घरींसुद्धां कमा नाहींसा झाला रे ? ( चंद्ररावास उद्देशून ) त्यांनीं कशी खाशी वेळ साधली ! जातों म्हणून मला नुसतें कळविलें देखील नाहीं. पण त्यांचा माझ्यावर खरा जीव बरें ! कुणाला न कळत लौकर ये म्हणून मला मूक धाडलें. बाळया, तुझें नशीब तुझ्याबरोबर. ( मुलाचे चुंबन घेऊन ) मी आतां येतें हं ! ( असें म्हणून लपवून आणलेला खंजीर चट्कन् उरांत भोसकते व पडते. मंडळी धांवतात; पण व्यर्थ. ) आतां मी तुमच्या देवाला सुद्धां भीत नाहीं बरें ! मांगानो ! कसायांनो ! रडा आतां मागें आमच्या नांवानें. अंबाबाई ! मला लवकर—( मरते. )

जिवाजी०—( गोंधळून ) तोच खंजीर खुपसा रे या माझ्या उरांत. नाहीं तर मला जिवंत तरी जाळून टाका !

( मूर्छा येऊन पडतो. त्याच वेळेस पडदाही पडतो. )

समाप्त.